दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ७३ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.८ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

# १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांना फास्ट टॅग अनिवार्य; कार्यनियमावलीतही सुधारणा

### पालमंत्र्यांची घोषणा कधी ?

**राज्य मंत्रिमंडळाची अधिवेशनानंतरची ही दुसरी बैठक आहे. या बैठकीत देखील राज्य मंत्रिमंडळाने दोन निर्णय घेतले आहेत. मात्र, राज्यातील जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाबाबत अद्याप कोणताच निर्णय झालेला नाही. २६ जानेवारी पूर्वी राज्यात सर्व जिल्ह्यांसाठी पालकमंत्र्यांच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र त्याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. पालकमंत्री पदाबाबत कोणताही तिढा नसल्याचे भाजपचे मंत्री बावनकुळे यांनी म्हटले होते. अजित पवार हे परदेशात गेल्यामुळे याबाबतचा निर्णय प्रलंबित असल्याचे देखील त्यांनी सांगितले होते. मात्र, अजित पवार आता परत आले आहेत. आजच्या बैठकीनंतर देखील पालकमंत्री पदाबाबतची घोषणा करण्यात आलेली नाही.**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील वाहनधारकांच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. आता १ एप्रिल २०२५ पासून राज्यामध्ये सर्व वाहनांना फास्ट-टॅग अनिवार्य करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या आज पार पडलेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग आनिवार्य असेल. शासनाच्या प्रचलित सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण-२०१४ मध्ये सुधारणा करणार (सार्वजनिक बांधकाम विभाग) १ एप्रिल २०२५ पासून राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करणार (सामान्य प्रशासन विभाग) शासकीय कारभार अधिक पारदर्शक, गतिमान, लोकाभिमुख करण्यासाठी बदल मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे,


मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर करायची प्रकरणे, मा. राज्यपाल यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती इत्यादी बाबींसंदर्भात तरतुदी.हा एक रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन टॅग आहे. जो वाहनाच्या विंडशील्डवर लावला जातो, जेणेकरून वाहन टोल प्लाझातून जाते तेव्हा टोल प्लाझावर उपस्थित असलेला सेन्सर फास्टॅग वाचू शकतो. तेथे बसवलेली उपकरणे आपोआप टोल टॅक्स वसूल करतात. त्यामुळे वाहनचालकांचा वेळ वाचतो.टोल प्लाझावरील सततच्या गर्दीमुळे हे कठोर पाऊल उचलण्यात आले आहे. त्यामुळे दररोज अनेक प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ज्याचे मुख्य कारण इलेक्ट्रॉनिक टोल वसुली प्रणालीचे उल्लंघन करणारे आहेत.कोराना नंतर आता चीनमध्ये क्व्हझत व्हायरसने थैमान घातले आहे. त्यामुळे आता भारतात देखील हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. भारतात देखील या विषाणूचे काही रुग्ण आढळून आले असून त्यात महाराष्ट्रातील नागपूर मध्ये देखील दोन रुग्ण आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील आरोग्य विभाग अलर्ट मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे. या संदर्भात आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी देखील नागरिकांना काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच या संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत देखील चर्चा झाली. यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.



# एचएमपीव्ही विषाणू घाबरू नका,मात्र काळजी घ्या-वर्धा जिल्हाधिकारी

### हे करू नका

- हस्तांदोलन टाळा.
- टिश्यू पेपर व रुमालाचा पुनर्वापर करू नका.
- आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळा.
- डोळे, नाक व तोंडाला वारंवार स्पर्श करणे टाळा.
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका.
- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेऊ नका.



**वर्धा । प्रतिनिधी**

कोरोना विषाणूसारखी लक्षणे असलेल्या ह्युमन मेटापनेमोवायरस (एचएमपीव्ही) विषाणूने नागरिकांची चिंता वाढवली असली तरी घाबरण्याचे कारण नाही, असे वर्धा जिल्हाधिकारी वान्मथी सी. व मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी स्पष्ट केले आहे. सध्या भारतात या विषाणूचे केवळ ४ रुग्ण आढळले असून, महाराष्ट्रात एकही रुग्ण आढळलेला नाही.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, एचएमपीव्ही विषाणू नवीन नसून जुना आहे. यामुळे कोरोनासारखी भीती बाळगण्याची आवश्यकता नाही. तथापि, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, मधुमेह व उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी खबरदारी घ्यावी, असे त्यांचे म्हणणे आहे.वर्धा जिल्ह्यात सर्दी, खोकला, आणि फुफ्फुसाच्या संसर्गाच्या (सारी) रुग्णांचे नियमित सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे आणि संभाव्य रुग्णांवर लक्ष ठेवले जात आहे.

वर्धा जिल्हा आरोग्य विभागाने नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. दिलेल्या सूचनांचे पालन करून आपण स्वतःचा व इतरांचा बचाव करू शकतो.

### हे करा

- खोकला किंवा शिंका येत असताना तोंड व नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
- साबण व पाण्याने किंवा अल्कोहोल-आधारित सॅनिटायझरने वारंवार हात स्वच्छ धुवा.
- ताप, खोकला असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहा.
- भरपूर पाणी प्या व पोषणमूल्ययुक्त आहार घ्या.
- घरात आणि कामाच्या ठिकाणी वायुवीजनाची (व्हेंटीलेशन) सोय करा.

# अजितदादा कुठे गेला तुमचा वादा?:आज फक्त इशारा आहे, उद्या कायदा हातात घेऊ-आ.बच्चू कडू

**अमरावती (वृत्तसंस्था)**

अमरावती येथे प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी शेतकरी, मेंढपाळ यांच्या हक्कासाठी मोर्चा काढला आहे. यावेळी त्यांनी भाषणात जोरदार हल्लाबोल केला आहे. एकीकडे शेतकरी मरतोय, दुसरीकडे मेंढपाळ मरतोय. राज्यात बगर मेहनतीच्या योजना सुरू केल्या. मात्र, ज्यांना डोळे नाही, पाय नाही त्यांना चार महिन्यांपासून पगार नाही. त्यामुळे अजितदादा कुठे गेला तुमचा वादा, अशी म्हणण्याची वेळ आली आहे, असा जोरदार प्रहार बच्चू कडू यांनी केला आहे.वाडा आंदोलनात भाषणात बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले, मी भाषणात वारंवार म्हणतोय हिंदू शेतकरी, हिंदू मेंढपाळ. मी हे का बोलतोय कारण धर्माच्या नावाने काहीजण राजकारण करत आहेत. ज्यांना डोळे नाही, पाय नाही त्यांना चार महिन्यापासून पगार नाही. त्यामुळे अजितदादा कुठं गेला तुमचा वादा. अशी म्हणण्याची वेळ आली आहे. आज फक्त इशारा आहे. कायदा मोडून हात लावला तर उद्या हातात कायदा घेतल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

आमदार बच्चू कडू म्हणाले, चारा आहे पण हात लाऊ देणार नाही हा कसला कायदा आहे. बटेंगे तो कटेंगे म्हणताय, तर मग मेंढपाळ पण कटणार का? आता



जर कर्ज भरले नाही तर पुढच्या वर्षी कर्ज भेटणार नाही. कृषिमंत्री म्हणाले की आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे चार पाच महीने कर्जमाफी होणार नाही. मग बोंबलले कशाला. जेवायला बोलवायचे आणि पळून जायचे. मात्र हम रुकने वाले औलाद नही, चलने वाले औलाद हे, न्याय हक्कासाठी मेलो तरी चालेल, असे बच्चू कडू म्हणाले.पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, आज आम्ही शांततेत आहोत, एकले तर ठीक नाहीतर पुढच्या वेळी हटा सावन की घटा. आम्ही शांततेच आंदोलन करणार आहोत. जो आमच्यात आडवा येईल त्याला दाखवू. पुढच्या वेळी इथे आल्यावर पुन्हा जाणार नाही. मी विभागीय कार्यालयात जाऊन येतो, जर ऐकले तर ठीक नाहीतर आत घुसू, असा थेट इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे. शेतमालाचा भाव, पीक कर्ज, मेंढपाळांना न्याय देण्यासाठी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात अमरावती येथे हे वाडा आंदोलन केले जात आहे.

# मुख्यमंत्र्यांचा ७ कलमी कृती कार्यक्रम:सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुकर होण्यासाठी सुधारणा करा

**मुंबई (वृत्तसंस्था)**


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना ७ कलमी कृती कार्यक्रम निश्चित करून दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी आज राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांच्याशी व्हिडिओ कॉनफरन्सद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रशासनाला येत्या १०० दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे यावर सविस्तर चर्चा केली आहे. तसेच या बैठकीत दिलेल्या सूचनांवर पुढे काय झाले यावर १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाणार असल्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते. यावेळी बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आपल्या कार्यालयाचे संकेतस्थल सुसज्ज करा, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून द्या. संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करा. शासकीय कार्यालयांची स्वच्छता करा, अनावश्यक कागदपत्रे काढून टाका, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करावीत, असे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत.पुढे अधिकाऱ्यांना सूचना देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह स्वच्छ राहतील, हे सुनिश्चित करा. अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी ते स्वच्छ दिसले पाहिजे. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी किमान दोन सुधारणा, नावीन्यपूर्ण उपक्रम आपल्या कार्यालयात राबवण्यात यावेत. प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, याचा प्रयत्न करा. अधिकारी नागरिकांना कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करा, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत.

# मुल येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय होणार

## आ.सुधीर मुनगंटीवार यांना उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांकडून बैठकीत मिळाला सकारात्मक प्रतिसाद

## मुलसह पोंभुर्णा,सावली,सिंदेवाही आणि चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना होणार लाभ





**मुल । प्रतिनिधी**

मुल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय व्हावे, यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी पाठपुरावा करून हा विषय लावून धरला. आता लवकरच हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत येणार आहे. त्यामुळे आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.वाघांचा जिल्हा म्हणून नावलौकिक असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण घ्यावे. जिल्ह्याचा नावलौकिक देशात वाढवावा. यासाठी जिल्ह्यातील मुल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिला होता. यासंदर्भात मंगळवार, दि. ७ जानेवारीला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात बैठक पार पडली. आ. मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे झालेल्या या बैठकीत तंत्रनिकेतन महाविद्यालयासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

यावेळी चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतली. तसेच मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मुलच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा प्रस्ताव मांडण्यासंदर्भात सूचना व निर्देश दिले. महाविद्यालयासंदर्भात वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आ. मुनगंटीवार यांनी विभागाचे अप्पर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी यांचे आभार मानले आहेत.चंद्रपूर सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाच्या माध्यमातून आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात येण्यास मदत होणार असल्याचा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

### आ.मुनगंटीवार यांनी दिले होते निर्देश

**चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असताना आ.मुनगंटीवार यांनी मुल येथे शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला होता. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने त्यांनी तंत्रशिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.त्यानंतर मुल येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याचे निर्देश दिले होते,हे विशेष.**

### या विद्यार्थ्यांना होणार लाभ

**या उपक्रमामुळे मूलसह पोंभूर्णा, सावली, सिंदेवाही आणि चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना लाभ होणार आहे. मुल येथे यापूर्वीच शासकीय कृषी महाविद्यालय सुरू झाल्याने शहराच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान मिळत आहे. शासकीय पॉलिटेक्निक सुरू झाल्यास मुल हे शिक्षणासाठी महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.**

# विज्ञान, गणित प्रदर्शनातुन देशाचे भवितव्य घडवणाऱ्या पिढ्या निर्माण होतील-वैभव पिचड



**अकोले | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मनात गणित विज्ञानातील संकल्पना रुजवणे, ग्रामीण भागात संशोधक, शास्त्रज्ञ घडवण्याचे काम होते शास्त्र व अध्यात्म हे प्रगत असेल तर देशाचे भवितव्य घडवणाऱ्या पिढ्या निर्माण होतील असे प्रतिपादन माजी आमदार वैभवराव पिचड यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कळस बुद्रुक या ठिकाणी ५२ वे अकोले तालुका विज्ञान व गणित प्रदर्शन दिनांक संपन्न झाले. या प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण समारंभ माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या शुभहस्ते व अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक श्री अमित भांगरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी अर्थ बांधकाम समिती चे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू वाकचौरे आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात अमित भांगरे म्हणाले की सध्याचे युग हे रोबोटिक्स, ए.आय. इनोव्हेशनचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग आहे एडिसन सारखं अनेक प्रयोग सफल झाले तरीही त्याचा बाऊ न करता विद्यार्थ्यांनी आपले प्रयत्न सुरू ठेवले पाहिजेत असे सांगितले. या प्रदर्शनात एकूण १३५ शाळांतील ३७० प्रतिकृतींचा समावेश करण्यात आला होता.

तालुकास्तरीय विज्ञान गणित प्रदर्शनात विज्ञान विभागात लहान व मोठ्या गटात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना अहमदनगर जिल्हा अध्यापक संघाची माजी अध्यक्ष सुरेश शिंदे यांच्या वतीने प्रत्येकी १००० रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. या बक्षीस वितरण समारंभात यावर्षीपासून शैक्षणिक वर्षात निवृत्त होणाऱ्या विज्ञान गणित शिक्षकांचा सन्मानही करण्यात आला. त्याचबरोबर यावर्षीचा मानाचा फिरता करंडक हा श्री स्वामी समर्थ माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय राजुर व आढळा विद्यालय देवठाण यांना विभागून देण्यात आला.

निवड प्राप्त विद्यार्थ्यांची पुढील प्रमाणे - खुलागट इयत्ता चौथी व पाचवी- प्रथम क्रमांक सत्यम बाळासाहेब जाधव (जि.प.प्राथ.शाळा नवलेवाडी ) उपकरणाचे नाव सौर ऊर्जा स्वयंचलित जलसिंचन यंत्रणा. द्वितीय क्रमांक अश्व बाबासाहेब गीते ( मुळा व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल कोतुळ ) उपकरणाचे नाव इलेक्ट्रॉनिक गेम उपकरण. तृतीय क्रमांक आराध्या प्रदीप घोडे, (जि.प.प्राथ.शाळा कोतुळ ) उपकरण प्रदूषण नियंत्रण नियंत्रण. विज्ञान विभाग इ. सहावी ते आठवी प्रथम क्रमांक ऋषभ प्रवीण आहेर ( धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूल विरगाव) वायु प्रदूषण सर्वेक्षक व कार्बन शुद्धीकरण. द्वितीय क्रमांक परि मच्छिंद्र महाडदेव ( जि. प. प्राथ. शाळा धामणगाव आवारी ) वाहन अपघात प्रतिबंधक तृतीय क्रमांक कावेरी राजेंद्र खताळ ( जि. प. प्राथ. शाळा कळस बु.) उपकरण मानव संसाधन उपयोजन. दिव्यांग गटात सिद्धेश संतोष हांगेकर ( श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुर) बहुउद्देशीय व्हीलचेयर.

विज्ञान विभाग इ. नववी ते बारावी प्रथम क्रमांक सिद्धार्थ मच्छिंद्र देशमुख ( श्री स्वामी समर्थ माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय राजुर) समर्थ वॉटर टँक क्लिनर. द्वितीय क्रमांक सच्चिदानंद संदीप गोडसे (आदर्श माध्यमिक विद्यालय ललित खुर्द ) बहुउद्देशीय विद्युत सायकल. तृतीय क्रमांक संचिता मंगेश गायकर ( सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ब्राह्मणवाडा) वाहनातील धुरापासून शाई निर्मिती. दिव्यांग गटात प्रकाश अशोक पथवे (आढळा विद्यालय देवठाण) बायोगॅस डिझेल. गणित विभाग इयत्ता सहावी ते आठवी प्रथम क्रमांक सानवी सचिन जगताप ( जि. प. प्राथ. शाळा सावरगाव पाट) गणितीय चौरस द्वितीय क्रमांक हांडे अलिशा संपत ( जि. प. प्राथ. शाळा मन्याळे ) क्लीनोमीटर तृतीय क्रमांक धृती रमेश देशमुख (परफेक्ट इंटरनॅशनल स्कूल अकोले ) पायथागोरसचे प्रमेय. दिव्यांग गटात अनुजा बाळू पराड ( आढळा विद्यालय देवठाण ) गणितीय प्रतिकृती. गणित विभाग उच्च माध्यमिक इयत्ता नववी ते बारावी प्रथम क्रमांक मानसी काकासाहेब देशमुख ( कन्या विद्यामंदिर अकोले ) त्रिकोणमितीचे उपयोग. द्वितीय क्रमांक श्रद्धा महेश पंडित (अगस्ती विद्यालय अकोले) त्रिकोणमिती. तृतीय क्रमांक करण हनुमंत पडवळे (मुळा माध्यमिक विद्यालय पिंपळगाव खांड) दोन क्रमवार सम किंवा विषम संख्यांचा गुणाकार. शिक्षक गटात शैक्षणिक साहित्य निर्मिती प्राथमिक शिक्षक प्रथम क्रमांक श्री बाळासाहेब श्रीरंग आरोटे ( जि.प. प्राथ. शाळा मुक्ताईची वाडी) कृतीयुक्त शिक्षण. द्वितीय क्रमांक श्रीमती अनिता अनिल चावडे (न्यू इंग्लिश स्कूल निम्रळ ) शैक्षणिक साहित्य. तृतीय क्रमांक श्रीमती स्मिता सुधाकर धनवटे ( जि.प. प्राथ.शाळा ठाकरवाडी विठे) घेऊ स्पर्धाचे ज्ञान राहू अन्यायापासून लांब. शैक्षणिक साहित्य माध्यमिक शिक्षक गट प्रथम क्रमांक श्री जगन्नाथ एकनाथ जाधव (शासकीय आदर्श आश्रमशाळा मवेशी) टाकाऊ वस्तु पासून शैक्षणिक साहित्य. द्वितीय क्रमांक श्री मंगेश कारभारी वाघ ( शासकीय माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रम शाळा केळी रुमणवाडी) द्रवरूप पदार्थाचे गुणधर्म. तृतीय क्रमांक श्री अमोल गौरव कासार ( शासकीय माध्यमिक आश्रम शाळा रतनवाडी ) न्यूटनचे गतीविषयक नियमांचा अभ्यास.

प्रयोगशाळा परिचर गट प्रथम क्रमांक श्री अनिकेत संजय गावडे (श्री लिंगेश्वर हायस्कूल लिंगदेव) जलशुद्धीकरण यंत्र. द्वितीय क्रमांक श्री वैभव सुनील वालझाडे (कळसुबाई माध्यमिक विद्यालय बारी) हातपंप. तृतीय क्रमांक श्री सुदामा अंबादास बटवाल (संत ज्ञानेश्वर विद्यालय शिळवंडी) मोबाईल दुरुपयोग. कार्यक्रम यशश्वितेसाठी सचिन वाकचौरे, धनंजय भांगरे, भास्करराव कानवडे, सतीश काळे, विजय भालेराव, श्याम मालुंजकर, विनोद नवले, अरविंद कुमावत, बाळासाहेब दोरगे, संभाजी झावरे, अनिल गायकवाड, बाळासाहेब आरोटे, शकील बागवान, तानाजी वाजे, माधवराव हासे स्मिता अडाणी, सविता कचरे यांनी विशेष प्रयत्न केले

# भाजप युवा मोर्चाच्या वतीने राज्यभर २५ लाख सदस्य नोंदणी अभियान

**पाथर्डी | प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चाच्या वतीने राज्यभर २५ लाख सदस्य नोंदणी करण्यासाठी विशेष अभियान राबवले जात आहे. या मोहिमेचा शुभारंभ शेवगाव मतदारसंघातील पाथर्डी येथे आमदार मोनिका राजळे यांच्या संपर्क कार्यालयात करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या हस्ते झाले.अनुप मोरे यांनी यावेळी सांगितले की, या अभियानातून युवकांना भाजपशी जोडून पक्षवाढ साधण्याचा आणि पर्यावरण संवर्धनाचा दुहेरी उद्देश साधला जाणार आहे. प्रत्येक नोंदणीधारकाला झाड सप्रेम भेट देण्यात येणार आहे. या मोहिमेद्वारे युवकांमध्ये पर्यावरणाबद्दलची जागरूकता वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे होते. भाजपच्या सदस्य नोंदणी मोहिमेत शेवगाव मतदारसंघातील युवा मोर्चाचे कार्यकर्ते सक्रिय सहभाग घेत असून, या मोहिमेमुळे पक्षवाढीला मोठा हातभार लागणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.यावेळी भाजप युवा मोर्चाचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख योगेश मैद, शहराध्यक्ष बंडू बोरुडे, निरंजन डहाळे, अभय आव्हाड, नंदकुमार शेळके, प्रशांत शेळके, सोमनाथ अकोलकर, अमोल गर्जे, प्रवीण राजगुरू, मुकुंद गर्जे, नितीन दहिवाळकर, सचिन वायकर, शुभम गाडे, पुरुषोत्तम आठरे, सतीश शिरसाठ, अनिल बोरुडे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.गेल्या पाच वर्षांत भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या धोरणांनुसार उल्लेखनीय काम केले असून, या मोहिमेमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला मोठा फायदा होईल, असे मोरे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू सुरवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमोल गर्जे यांनी मानले.

## सिव्हील लाईन परिसरातील अतिक्रमण हटवले

# १०० हून अधिक दुकाने आणि हातगाड्यांवर कारवाई

**वर्धा | प्रतिनिधी**

सिव्हील लाईन परिसरात वाढलेल्या अतिक्रमणावर नगर परिषदेने मोठी कारवाई केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर ते महिला आश्रम शाळेपर्यंत रस्त्याच्या कडेला असलेले १०० हून अधिक दुकाने व हातगाड्या हटविण्यात आल्या, तर ३० ते ३५ हातगाड्या जप्त करण्यात आल्या. ही कारवाई मंगळवार, ७ जानेवारी रोजी सकाळपासून दुपारपर्यंत करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर ते गांधी चौक मार्गावर अनेक शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये असल्यामुळे या परिसरात कायमच वाहतुकीची वर्दळ असते. मात्र, रस्त्याच्या कडेला असलेल्या हातगाड्या, दुकाने आणि स्टॉल्समुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. विशेषतः या मार्गावर दारू विक्रीचे प्रकारही सुरू असल्याची तक्रार





प्राप्त झाली होती.शाळा आणि महाविद्यालय प्रशासनाने तक्रार केल्यानंतर नगर परिषदेने मुख्याधिकारी राजेश भगत यांच्या आदेशानुसार ही कारवाई केली. अतिक्रमण हटविण्याचे काम नगरपरिषदेचे कर्मचारी अशोक ठाकूर, निखिल लोहवे, स्वप्नील खंदारे यांनी पोलिसांच्या मदतीने पार पाडले.अतिक्रमण हटविण्यासाठी अधूनमधून मोहीम राबविली जाते, मात्र मोठ्या व्यापाऱ्यांऐवजी छोटे व्यवसायिकच अधिक भरडले जात असल्याची नागरिकांत नाराजी आहे.

### सराफा बाजारा कडे दुर्लक्ष का?

**नगर परिषदेच्या या कारवाईने छोटे दुकानदार व हातगाडीवाले प्रभावित झाले असले तरी शहरातील सराफा बाजारातील अतिक्रमणाचे काय? हा प्रश्न उपस्थित होत आहे. या भागातील अतिक्रमणाचीही दखल घेतली जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

# जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन पत्रकारांनी वंचित,उपेक्षितांची बाजू मांडण्यासाठी लेखणी झिजवावी-ॲड.प्रमोद राऊत

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जनतेचा अतूट विश्वास असल्याने जनतेच्या अतूट विश्वासाला तडा न जाऊ देता पत्रकारांनी निष्पक्ष, निस्वार्थ, निधर्मी लेखणी करून पत्रकारितेचा उपयोग समाजविकासासाठी झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावा, जाती- धर्माच्या पलीकडे जाऊन पत्रकारांनी वंचित, उपेक्षितांची बाजू मांडण्यासाठी लेखणी झिजवावी असे आवाहन वकील संघाचे अध्यक्ष ड प्रमोद राऊत यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,जामखेड तालुका वकील संघ,आरंभ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोर्ट रोड येथील पत्रकार संघाच्या कार्यालयात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्ताने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रकाश खंडागळे,वसंत सानप,दीपक देवमाने,पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष ओंकार दळवी,उपाध्यक्ष समीर शेख,सचिव संदेश हजारे,कार्याध्यक्ष सचिन अटकरे,प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष नयूम सुभेदार,राष्ट्रवादीचे अमर चाऊस,भुजंग





दळवी,विक्रम जमदाडे,संजय फुटाणे,रमजान मदारी,अमोल चौरे,चेतन राळेभात आदींसह नागरिक उपस्थित होते. यावेळी वसंत सानप यांनी पत्रकारांना महाभारतातील संजयची उपमा देत दूरदृष्टी ठेऊन पत्रकारिता करावी जेणेकरून समाज घडेल.समाजातील दुर्लक्षित घटकाला न्याय मिळेल.असे प्रतिपादन केले. यावेळी जामखेड वकिल संघाच्या अध्यक्षपदीप्रमोद राऊत यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# ८२ विद्यार्थ्यांना मिळाला 'कमवा व शिका' योजनेचा लाभ






**कोरपना | प्रतिनिधी**

महात्मा गांधी कॉलेज ऑफ सायन्स, गडचांदूर येथील विद्यार्थी विकास विभागातर्फे कमवा व शिका योजनेतील लाभान्वित विद्यार्थ्यांना सोमवारी धनादेश वितरित करण्यात आले.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा राबविण्यात येणाऱ्या कमवा व शिका योजना सत्र २०२३-२०२४ महाविद्यालयात राबविण्यात आली. महाविद्यालयाच्या ८२ विद्यार्थ्यांनी वर्षभर महाविद्यालयातील विविध विभागात दररोज किमान तीन तास काम केले. त्याचा अहवाल विद्यापीठाकडे पाठविण्यात आला.विद्यापीठाद्वारे २ लाख ९ हजार १६० रुपये मंजूर झाले. विद्यार्थ्यांना धनादेश वितरीत करण्यासाठी विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. अजय कुमार शर्मा यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शैलेंद्र देव उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष विठ्ठल थिपे, सचिव धनंजय गोरे, संचालक रामचंद्र सोनपितरे उपस्थित होते. संचालन ग्रंथपाल मनोहर बांदरे यांनी केले. आभार प्रा. चेतन वैद्य यांनी मानले. यावेळी डॉ. अनिस खान, प्रा. रामकृष्ण पटले, प्रा. चेतन वानखेडे, प्रा. संदीप घोडिले तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# समाजसेवक हिरामण राऊत यांचे निधन

**चिमूर | प्रतिनिधी**



तालुक्यातील जवराबोडी येथील ज्येष्ठ समाजसेवक हिरामण बापूरावजी राऊत (वय ८२) यांचे ५ जानेवारी २०२५ रोजी, रविवारी रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी आपल्या आयुष्यात निस्वार्थपणे गावाची सेवा केली होती. त्यांच्या निधनाने गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. हिरामण राऊत यांनी समाजसेवेसाठी अनेक उपक्रम राबवले होते. त्यांच्या कार्यामुळे ते गावात आदराचे स्थान मिळवून होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यसंस्कार ६ जानेवारी रोजी, सोमवारी दुपारी ३ वाजता जवराबोडी येथील स्मशानभूमीत करण्यात आला. त्यांच्या निधनाने गावाने एक निस्वार्थ समाजसेवक गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

## ऑनलाईन अर्ज करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**गडचिरोली | प्रतिनिधी**

अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकिय वसतीगृहात अर्ज करुनदेखील शासकिय वसतीगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे आणि विद्यार्थ्यांना भोजन, निवास, निर्वाह भत्ता, व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेणेसाठी आवश्यक ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करणे करिता शासनाने दि.२६ डिसेंबर २०२४ च्या सुधारित शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आलेली आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात योजनेचा लाभ घेणेकरिता विद्यार्थ्यांना वसतीगृह व स्वाधार योजनेचे अर्ज करणेकरिता https://hmas.mahait.org ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकिय वसतीगृहात अर्ज करुन देखील शासकिय वसतीगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रणालीद्वारे भारतरत्नडॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरिता ग्राह्य धरले जावून नियमानुसार पुढील पडताळणीसाठी संबंधित सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगईनवर अग्रेशित केले जातील. सदर माहिती पोर्टलवरील लॉगीनमध्ये विद्यार्थ्यांनी परिपूर्ण भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सदर माहिती अपूर्ण भरल्यास सदर अर्ज अपात्र करण्यात येईल व त्यासाठी सर्वस्वी विद्यार्थी जबाबदार राहील याबाबत नोंद घेण्यात यावी, असे समाज कल्याण विभागाचे सहाक आयुक्त डॉ. सचिन मडावी यांनी कळविले आहे.



# उन्हाळ्यात पूर्ण क्षमतेने शेतकरी बांधवांना आवर्तन मिळावे-कोल्हे

**कोपरगाव । प्रतिनिधी**

चालु पावसाळी हंगामात उशीराने पर्जन्यमान झाल्याने गोदावरी कालवे लाभधारक शेतक-यांना रब्बी व उन्हाळ हंगामाच्या पाण्याच्या आवर्तनात योग्य नियोजन करून देण्यात येणारे आवर्तने पुरेसे क्षमतेने द्यावी म्हणजे त्यामुळे अधिकचे आवर्तन न लागता शेतक-यांच्या पाणीपटटीत बचत होईल. गोदावरी कालव्यांचे आर्युमान शंभर वर्षापेक्षा जास्त झाले असुन त्याच्या नुतणीकरणासाठी धडक कृती कार्यक्रम हाती घ्यावा अशी मागणी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी कालवा सल्लागार बैठकीत बोलतांना केली.

जिल्हा सहकारी बँकेच्या राहाता शाखेतील सभागृहात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली बारमाही गोदावरी कालवे लाभधारक कालवा सल्लागार समितीचे बैठक नुकतीच पार पडली त्यात विवेक कोल्हे बोलत होते. तुटीच्या गोदावरी खो-यात पश्चिमेचे समुद्राला अतिरिक्त वाहुन जाणारे पाणी पुर्वेकडे वळवावे म्हणून माजमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी विधीमंडळात



मंजुरी घेतली असुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कृष्णा खो-याप्रमाणे कार्यक्रम राबवुन नगर नाशिकसह मराठवाडयाच्या प्रादेशिक पाणीवादात शेतक-यांना न्याय द्यावा असेही ते म्हणांले.

विवेक कोल्हे पुढे म्हणाले की, उन्हाळयात तीन आर्वतने दिली तर शेतक-यांना रब्बी हंगामाची ८ हजार ५०० रूपये पाणीपटटीचा उदंड पडतो, तेंव्हा आहे त्या पाण्यांच्या दोन आर्वतनांत बचत करून तिसरे उन्हाळ पाण्यांचे आर्वतन दिल्यास शेतक-यांच्या पाणीपटटीत ३ हजार ५०० रूपयांची बचत होणार आहे, उन्हाळ हंगाम आर्वतनाचा कालावधी वाढवावा. कालवा आर्वतन सोडण्यापुर्वी ज्या चा-या, उपचा-या आहे त्याची दुरूस्ती करावी.

गोदावरी कालवे नुतणीकरणाचा प्रश्न अनेक वर्षापासुन प्रलंबित आहे. उजव्या कालव्यासाठी १९१ कोटींचा निधी मंजुर झाल्याचे समजले मात्र डाव्या कालव्यास अजुन निधीच मंजुर नाही तेंव्हा तो तातडीने उपलब्ध व्हावा.

शेजपाळी पाण्यांचे रजिष्टर अद्यावत ठेवले जावे, आर्वतन काळात नाशिक पाटबंधारे अंतर्गत जलसंपदा खात्याचा कर्मचारी वर्ग अपुरा असल्यांने शेतक-यांना त्याचा त्रास सहन करावा लागतो तेंव्हा हा कर्मचारी वर्ग तात्काळ भरला जावा, नांदुर मध्यमेश्वर ते हरिसन ब्रांच व हरिसन ब्रांच ते श्रीरामपुर असे दोन भाग या कालव्यास पडतात तेंव्हा हरिसन ब्रांच ते श्रीरामुपर टेल अशा पध्दतीने पाण्यांचे आर्वतन व्हावे जेणेकरून हरिसन ब्रांच धारक शेतक-यांच्या अडी अडचणी दुर होतील.

बिगर सिंचन पाण्यांचा भार दारणा गंगापुर धरण कार्यक्षेत्रावर वाढतो आहे त्याचा फटका बारमाही गोदावरी कालवे लाभधारकांना बसत आहे त्यासाठी पश्चिमेचे पाणी पुर्वेकडे आणले जावे असे ते शेवटी म्हणाले. याप्रसंगी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाउसाहेब वाकचौरे, माजी आ.स्नेहलता कोल्हे,आ. आशुतोष काळे, आ. हेमंत ओगले, उत्तर महाराष्ट्र प्रदेश जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धने, नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती सोनल शहाणे, उजव्या तट कालव्याचे उपअभियंता संभाजी पाटील, डाव्या कालव्याचे उपअभियंता संदिप पाटील, विविध सहकारी पाणीवापर संस्थांचे पदाधिकारी, लाभधारक शेतकरी, सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आदि मोठया संख्येने उपस्थित होते.

# गरीब विक्रेत्यांना लक्ष्य करू नका-खासदार निलेश लंके यांचा महानगरपालिकेला इशारा

**पारनेर । प्रतिनिधी**

आहिल्यानगर शहरात महानगरपालिका अतिक्रमण मोहीम राबवत असून, रस्त्याच्या कडेला व्यवसाय करणाऱ्या गरीब फळविक्रेत्यांना, हातगाडीवाल्यांना आणि चहावाल्यांना उगाच लक्ष्य केले जात आहे. या मोहिमेमुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. कोणत्याही कायमस्वरूपी बांधकामाविना केवळ रस्त्याच्या कडेला बसून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या विक्रेत्यांची समस्या गंभीर झाली आहे.



खासदार निलेश लंके यांनी या गरीब विक्रेत्यांची भेट घेतली आणि त्यांच्या समस्यांबद्दल संवेदनशीलता व्यक्त केली. महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी गरीब विक्रेत्यांना त्रास देणे थांबवावे, असा कडक इशारा दिला. हे मेहनती लोक दिवसरात्र कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहेत. त्यांना हटवून त्यांच्या पोटावर पाय देणे अमानवी आहे. नो-हॉकर्स झोनमध्ये नियम लागू करा, पण ज्यांच्याकडे कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम नाही त्यांना लक्ष्य करू नका, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

खासदार लंके यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना ताकीद देताना गरीब विक्रेत्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असे ठामपणे म्हटले. श्रीमंत आणि गरीबांमध्ये भेदभाव होऊ नये. गरीबांना हटवून त्यांची उपजीविका काढून घेणे हे अन्यायकारक आहे. महानगरपालिका आयुक्त त्यांच्या कुटुंबांचे पालनपोषण करणार नाहीत. त्यामुळे या विक्रेत्यांना त्यांच्या हक्काचे काम करू द्या, असे त्यांनी सांगितले.

खासदार लंके यांच्या हस्तक्षेपामुळे गरीब विक्रेत्यांना आधार मिळाला असून, त्यांच्या संघर्षाला दिशा मिळाली आहे. प्रशासनाने आता संवेदनशील होऊन गरीबांच्या प्रश्नांकडे योग्य दृष्टीने पाहावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वाहतूक नियमांचे पालन केल्यास रस्ता अपघातांमध्ये होईल घट-अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले

**वर्धा । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षेसाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, वेगावर नियंत्रण ठेवणे आणि सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. यामुळे रस्ता अपघातांची संख्या कमी करता येईल, असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांनी केले.राज्य रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत आयोजित या मोहिमेचे उद्घाटन न्यु आर्टस, कॉमर्स कॉलेज येथे करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, परिवहन विभागाचे अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी वाहनचालकांना अपघात टाळण्यासाठी वाहतुकीचे नियम काटेकोर पाळण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, वेगावर नियंत्रण ठेवणे, मद्यपान करून वाहन न चालवणे, हेल्मेटचा वापर करणे, तसेच वाहन सुस्थितीत असल्याची खात्री करणे या सवयी अंगीकारल्यास अपघात कमी होऊ शकतात.जिल्ह्यात मागील वर्षी रस्ता अपघातांमध्ये ३२% घट झाली असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे यांनी दिली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २०० वाहनचालकांचे परवाने रद्द करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमात रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याची शपथ घेण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते वाहतुकीच्या नियमांचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन राहुल ढोबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन करण्यात आले.

# भाजपा च्या वतीने पत्रकारांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

## जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन

**सोलापूर । प्रतिनिधी**

देशाच्या जडणघडणीत पत्रकारांचे महत्त्वपूर्ण योगदान असून, समाजातील विविध प्रश्नांवर आवाज उठवून आणि सामाजिक कार्यांना योग्य न्याय देण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार करत असतात. या योगदानाची दखल घेत भारतीय जनता पार्टी करमाळा यांच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा शहर व तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ऍड. हभप डॉ. बाबुराव हिरडे होते, तर पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि भाजपा बुद्धिजीवी आघाडीचे शहराध्यक्ष सुहास घोलप हे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या पत्रकारांचा शशिकांत पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी पत्रकारांच्या कार्याबद्दल मनोगत व्यक्त करत त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते संजय घोरपडे, जिल्हा चिटणीस शाम सिंधी, विनोद महानवर,




बाळासाहेब कुंभार, किसान मोर्चाचे नरेंद्र ठाकूर, माजी शहराध्यक्ष आदेश कांबळे, शहर सरचिटणीस जितेश कटारिया, शहर उपाध्यक्ष सचिन चव्हाण, सोशल मीडिया प्रमुख नितीन कांबळे आदी उपस्थित होते.सन्मान सोहळा अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडला आणि पत्रकार दिनाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला.

# अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीचे कार्य देशाला मार्गदर्शक-निवडणूक आयुक्त संधू

## अमेरिकन मेरिट कौन्सिलच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांचा गौरव

**अकोले । प्रतिनिधी**

अमेरिकेच्या अमेरिकन मेरिट कौन्सिलने प्रदान केलेला गौरव जिल्ह्यासाठी निश्चितच भूषणावह असून स्वीप समितीचे कार्य राज्याला व देशाला मार्गदर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन भारत निवडणूक आयोगाचे आयुक्त सुखविंदर संधू यांनी केले.

शिर्डी येथील भेटीच्यावेळी श्री संधू बोलत होते. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी श्री. संधू यांच्या हस्ते कौन्सिलचे गौरवपत्र स्वीकारले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर , प्रांताधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, जिल्हा मतदारदूत डॉ. अमोल बागुल, निवडणूक नायब तहसीलदार प्रशांत गोसावी आदी उपस्थित होते.



अमेरिकन मेरिट कौन्सिल ही आय.एस.ओ. प्रमाणे अमेरिकास्थित गुणवत्ता नामांकन व मानांकन देणारी परीक्षण संस्था असून याद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जा आणि मानकीकरण प्रदान केले जाते. अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या निवडणुकीतील विविध उपक्रमासाठी संस्थेकडून हे प्रमाणपत्र जिल्ह्याला प्राप्त झाले आहे.

जिल्हाधिकारी सालीमठ यांनी मतदान प्रक्रियेतील मतदार नोंदणी, स्वीप उपक्रम याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, विधानसभा व लोकसभा निवडणुकीमध्ये अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या वैशिष्ट्यपूर्ण मतदार जनजागृती उपक्रम अंतर्गत राबवलेल्या विविध नावीन्यपूर्ण संकल्पनांमुळे मतदानाची टक्केवारी वाढली आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा अचूक व चपखल वापर स्वीप समितीने केल्याने मतदारांना मतदान प्रक्रीयेविषयी सुलभतेने माहिती मिळाली. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काम केल्याने मतदान टक्केवारी वाढविण्यात देशात व राज्यात जिल्हा सरस ठरला आहे. यापुढील कालावधीतदेखील नाविन्यपूर्ण स्वीप उपक्रमातून मतदार जनजागृतीचे कार्य निरंतर चालू राहील असेही, जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

मतदार जनजागृतीह उपक्रमांचा अहवाल यावेळी श्री. संधू यांना देण्यात आला. त्याचबरोबर व्हीआर बॉक्सच्या माध्यमातून मतदान केंद्रातील बाह्य व अंतर्गत रचनेचा थ्रीडी व्हिडिओ उपक्रमाची माहिती त्यांनी स्वत: उपकरणाचा उपयोग करून घेतली. स्वीप समितीच्या गुगल असिस्टंटच्या मतदार जनजागृती उपक्रमाविषयी त्यांनी विशेषत्वाने जाणून घेतले.

# मार्गदर्शिका मतदारांपर्यंत पोहोचल्याच नाहीत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदार जागृतीसाठी भारत निवडणूक आयोगाने पाठविलेल्या मार्गदर्शिका निवडणुकीनंतरही तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेत पडून आहेत, अशी धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नेवासा तालुका भारतीय जनसंसदने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



हुशार मतदार व्हा, मतदार मार्गदर्शिका, तसेच चुनाव का पर्व - देश का गर्व अशा उल्लेखांसह लाखो पत्रकांचे गठ्ठे अजूनही तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेत तसेच पडून आहेत. मतदार जागृतीसाठी आलेली ही पत्रके मतदारांपर्यंत पोहोचली नाहीत की ती देण्याचा प्रयत्नच झाला नाही, असा प्रश्न नेवासा तालुका भारतीय जनसंसदचे तालुकाध्यक्ष रामराव भदगले, उपाध्यक्ष कारभारी गरड, डॉ. अशोकराव ढगे, सचिव प्रा. नानासाहेब खराडे आणि नेवासा शहराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी उपस्थित केला आहे.

या पत्रकांमध्ये मतदार नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन व ऑफलाइन कशी करावी, मतदान करताना कोणती काळजी घ्यावी, मतदान प्रक्रियेची माहिती, तसेच भारत निवडणूक आयोगाचे प आणि त्याद्वारे मिळणाऱ्या सुविधांची सविस्तर माहिती होती. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी घरून किंवा टपालाने मतदानाची सुविधा, तसेच मतदारांची प्रतिज्ञा यांचा समावेश असलेल्या या मार्गदर्शिका निवडणुकीनंतरही तहसील कार्यालयात धूळ खात पडून आहेत.

मतदार जागृतीसाठी किती पत्रके आली, त्यातील किती मतदारांपर्यंत पोहोचवली गेली आणि ही जबाबदारी कोणाची होती, याचा तातडीने शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनसंसदच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

सुमारे दोन महिन्यांपासून पडून असलेल्या या पत्रकांवर नेवासा तालुका भारतीय जनसंसदने तीव्र नाराजी व्यक्त केली असून यामुळे मतदार जागृतीसाठी करण्यात आलेले प्रयत्न अपुरे राहिल्याचे त्यांनी म्हटले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घालून कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# नाल्यात अडकलेल्या अजगराला वाचवून सुरक्षित जंगलात सोडले



**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील चिखली येथील श्री पंकज कडस्कर यांच्या शेताच्या बाजूला असलेल्या नाल्यात एका मोठ्या अजगराला जाळ्यात अडकलेल्या अवस्थेत आढळून आले. ही माहिती मिळताच संजीवन पर्यावरण संस्थेच्या सदस्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन अजगराला सुरक्षितपणे सोडवले आणि जंगलात मुक्त केले.

संस्थेचे सदस्य दिनेश खेवले आणि निखिल ठाकरे यांनी या बचाव कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी अत्यंत दक्षतेने आणि अनुभवाचा वापर करून अजगराला जाळ्यातून मुक्त केले. नंतर त्याला नैसर्गिक अधिवासात परत सोडून वन्यजीव संरक्षणाचे उदाहरण घालून दिले.

संजीवन पर्यावरण संस्था वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरण जपण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. संस्थेच्या या वेळी केलेल्या तातडीच्या कारवाईमुळे अजगराला जीवदान मिळाले. या कार्यामुळे गावकऱ्यांनी संस्थेच्या सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि त्यांची प्रशंसा केली.

अशा घटना पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यास मदत करतात, असे ग्रामस्थांनी सांगितले.

## प्राथमिक शाळांना १०० पटास मुख्याध्यापक पद मंजूर करावे

# शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे पुरोगामी शिक्षक संघटनेची मागणी




**मुल । प्रतिनिधी**

राज्यातील इयत्ता १ ते ७ च्या संयुक्त प्राथमिक शाळांना १०० पटास मुख्याध्यापक पद मंजूर करावे, अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

२८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ६ वी ते ८ वी च्या शाळांना १०० पट असताना मुख्याध्यापक पद मंजूर आहे. मात्र, इयत्ता १ ते ७ च्या प्राथमिक शाळांना १०० पट असूनही मुख्याध्यापक पद मंजूर नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मुख्याध्यापक आणि पुरेसे शिक्षक आवश्यक असल्याची भूमिका संघटनेने मांडली.मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण या चर्चासत्रात प्रसाद पाटील यांनी या मागण्या शिक्षणमंत्र्यांसमोर ठेवल्या.

प्रलंबित मागण्या टप्प्याटप्प्याने सोडवण्यात येतील, असे आश्वासन शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले. त्यांनी शिक्षक संघटनांनी मांडलेल्या सूचना व मागण्यांवर शासन सकारात्मक विचार करेल, असे सांगितले.

यावेळी संघटनेच्या वतीने शिक्षणमंत्री दादा भुसे यांना दिलेल्या निवेदनात सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना इयत्ता ५ वी व ८ वी चे वर्ग जोडावेत, दि.१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयातील संचमान्यतेचे अन्यायकारक निकष रद्द करावेत, सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे रद्द करून शिक्षकांना फक्त शिकवू द्यावे, १०० टक्के विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मिळावी, सर्व रिक्त पदे भरण्यात यावीत, जिल्हांतर्गत बदली व आंतरजिल्हा बदली धोरणातील त्रुटी दूर करून आंतरजिल्हा व जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया व्हावी, कंत्राटी शिक्षक व शिक्षणसेवक धोरण रद्द करावे, शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट शिथील करावी, वस्तीशाळा शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने सर्व लाभ मिळावेत, जि.प.शाळांच्या विभाग स्तर व राज्य स्तरावर क्रीडा स्पर्धा व्हाव्यात, मासिक वेतन व निवृत्ती वेतन वेळेवर मिळावे, सर्व प्रकारची प्रलंबित देयके अनुदान तत्काळ वितरीत व्हावे, पदवीधर शिक्षकांमधुन मुख्याध्यापक किंवा केंद्र प्रमुख पदी पदोन्नती झालेल्या शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतनवाढ मिळावी, न.पा व म.न.पा. मधील शिक्षकांचे १०० टक्के वेतन अनुदान शासनाकडून मिळावे, सर्व प्रकारची पदोन्नती प्रक्रिया वर्षांपासून २ वेळा होण्याचे निर्देश व्हावेत, संगणक अर्हता मुदतवाढीचा शासन निर्णय व्हावा, सी सी टी व्ही बसविण्यास अनुदान मिळावे, शालेय पोषण आहार यंत्रणा मध्ये असलेल्या त्रुटी दूर कराव्यात, प्रत्येक शाळेस शिपाई व क्लार्क पद मंजूर व्हावे, सर्व शाळांना कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण विषयाचे शिक्षक मिळावेत, आदी मागण्यांचा समावेश आहे.

निवेदनावर संघटनेचे राज्य नेते विजय भोगेकर, राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरिश ससनकर, महिला राज्याध्यक्षा अलका ठाकरे, महिला राज्य सरचिटणीस शारदा वाडकर, कोल्हापूर जिल्हा प्रमुख संघटक श्रीकांत टिपुगडे आदींच्या सह्या आहेत. चर्चा सत्रास राज्याच्या शालेय शिक्षक विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल , शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग , सेवानिवृत्त प्रधान सचिव नंदकुमार , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार , प्राथमिक विभागाचे शिक्षण संचालक शरद गोसावी , योजना विभागाचे शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन , शिक्षण संचालक . कृष्णकुमार पाटील , संपत सूर्यवंशी साहेब या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते .असे चंद्रपुर जिल्हाप्रसिद्धिप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी कळविले आहे

## वर्ध्यात शरीर सौष्ठव स्पर्धा रंगली; सौरभ वरठी ठरला 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स'

**वर्धा । प्रतिनिधी**



सुदृढ शरीरसंपदा आणि फिटनेसच्या वाढत्या क्रेझमुळे शरीर सौष्ठव स्पर्धांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. वर्ध्यात युवक एकता क्रीडा मंडळाने आयोजित शरीर सौष्ठव स्पर्धेत तरुणांनी पिळदार शरीराचे दमदार प्रदर्शन केले. जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत विविध गटांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.


स्पर्धेत ५५ किलो गटात सकूर शेख, ६० किलो गटात अमर ठाकरे, ६५ किलो गटात सौरभ वरठी, ७० किलो गटात मोहित कुराडकर आणि ७५ किलो गटात पंकज ढाकुळकर यांनी अनुक्रमे आघाडी घेतली. सौरभ वरठी याला 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स'चा किताब मिळाला, तर गजानन ढाकुळकरला 'बेस्ट पोजर' आणि अमर ठाकरेला 'बेस्ट मस्क्युलर' म्हणून गौरवण्यात आले.

गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाचे कौतुक केले आणि पुढील वर्षीपासून विदर्भ पातळीवरील स्पर्धा आयोजित करण्याची घोषणा केली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही स्पर्धेचे कौतुक करत, शारीरिक स्वास्थ्य ही सुदृढ समाजाची गरज असून अशा उपक्रमांमुळे आरोग्यदायी संदेश दिला जातो, असे सांगितले.

कार्यक्रमाला आमदार समीर कुणावार, आमदार रवी राणा, माजी खासदार रामदास तडस, अभिनेता देवदत्त नागे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महेश वसु, डॉ. मदन इंगळे, अजय वरटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष योगदान दिले.

## 'एचएमपीव्ही' विषाणू हा सामान्य आजार भीती नको, दक्षता बाळगा

**गडचिरोली । प्रतिनिधी**



ह्युमन मेटान्यूमोव्हायरस ( एचएमपीव्ही) हा एक सामान्य विषाणू असून नागरिकांनी त्याची भिती न बाळगता या संसर्गापासून बचावासाठी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन, आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

एचएमपीव्ही श्वसन मार्गाच्या वरील भागातील संसर्गास कारणीभूत ठरतो. हा हंगामी रोग असून हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातील सामन्यत: आरएसव्ही आणि फ्लू प्रमाणे उद्भवतो. सध्या चीनमध्ये ह्यूमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) या आजाराचे रुग्ण वाढले, अशा बातम्या येत आहेत. हा विषाणू सर्वप्रथम २००१ मध्ये नेदरलँडमध्ये आढळला.

सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. तथापि खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गपासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढील सुचानाचे पालन करावे.

काय करावे : १. खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा तोंड आणि नाक, रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाकावे. २. साबण आणि पाण्याने आपले हात वारंवार धुवा. ३. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणापासून दूर राहा. ४. भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्न खा. ५. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेटीलेषण) होईल, याची दक्षता घ्या.

काय करू नये : १. हस्तांदोलन, २. टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर, ३. आजारी लोकांशी जवळचा संपर्क, ४. डोळे,नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे. ५. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. ६. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध(सेल्फ मेडिकेशन)घेणे.

## वंचित बहुजन आघाडी दक्षिण विभागाची बैठक ९ जानेवारीला

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी दक्षिण वंचित बहुजन आघाडीची जिल्हा कार्यकारिणी बैठक ९ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह, गंगाखेड येथे आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष सुनील मगरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत सोमनाथ सूर्यवंशी आणि विजय वाकोडे यांना न्याय मिळवण्यासाठी परभणी येथे विराट मोर्चा आयोजित करण्याबाबत चर्चा होणार आहे.

यासोबतच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची चर्चा, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना पदमुक्त करण्यासाठी प्रस्ताव पाठवणे, तसेच कार्यकारिणीचा विस्तार या विषयांवरही निर्णय घेण्यात येणार आहे.

जिल्हा महासचिव दिलीप मोरे आणि जिल्हा संघटक शुद्धोदन सावंत यांनी या बैठकीसाठी सर्व आजी-माजी पदाधिकारी, इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## तालुका पाणी टंचाई आढावा बैठक संपन्न

**हिंगणघाट**–हिंगणघाट तालुक्यातील पाणी टंचाईचा आढावा घेण्यासाठी आज स्थानिक पंचायत समिती हिंगणघाट येथील सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षत्व हिंगणघाट विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर कुणावार यांनी केले, तर देवळी विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश बकाणे आणि जिल्हा परिषद वर्धाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांच्या प्रमुख उपस्थितीने बैठक पार पडली.या बैठकीत आमदार समीर कुणावार यांनी पाणी टंचाईच्या परिस्थितीचा विस्तृत आढावा घेतला आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना हिंगणघाट तालुक्यातील प्रत्येक गाव पाणी टंचाई मुक्त व्हावे, असा संकल्प व्यक्त केला. यानंतर पुढील नियोजनासाठी आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन बैठकीत दिले गेले.आगामी काळात पाणी व्यवस्थापनासाठी विविध उपाययोजनांचा समावेश करण्यात येणार असून, या बैठकीत त्यावर चर्चा झाली.

## टोरेस ज्वेलरी घोटाळा कोट्यवधींची फसवणूक

### गुंतवणूकदारांचे पैसे घेऊन मालक पळाले

**मुंबई, दादर । प्रतिनिधी**

मुंबईतील दादर परिसरात एक मोठा आर्थिक घोटाळा समोर आला आहे. टोरेस ज्वेलरी कंपनीने हजारो मुंबईकरांना फसवले आहे. आर्टिफिशियल डायमंड विकणाऱ्या या कंपनीने लोकांना आठवड्याला ६ ते १० टक्क्यांपर्यंत परतावा देण्याचे आश्वासन दिले होते आणि लाखो रुपये गोळा केले. सुरुवातीला काही वेळा परतावा देण्यात आला. मात्र, गेल्या दोन आठवड्यांपासून कोणताही परतावा मिळाल्याने गुंतवणूकदारांच्या शंका अधिक गडद झाल्या.

त्यानंतर हा घोटाळा उघडकीस आला आणि कंपनीचे मालक गुंतवणूकदारांची फसवणूक करून पळून गेले. पोलिसांनी या प्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी पुढील तपास सुरू असून, टोरेस ज्वेलरी कंपनीचे मालक आणि सहभागी इतर व्यक्तींचा शोध घेतला जात आहे.

# तालुकास्तरीय किशोरी मेळावा उत्साहात संपन्न

## करमाळा पंचायत समिती शिक्षण विभागाचं आयोजन

**सोलापूर । प्रतिनिधी**

पंचायत समिती शिक्षण विभाग करमाळा यांच्या वतीने तालुकास्तरीय किशोरी मेळावा कमला भवानी सांस्कृतिक सभागृह, श्रीदेवीचामाळ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जातेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील सातवीची विद्यार्थिनी तनिष्का शिंदे होती.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस सहाय्यक निरीक्षक गिरीजा म्हस्के, डॉ. सुनीता दोशी, ॲड. अपर्णा पदमाळे, योग शिक्षक बाळासाहेब नरारे, योग शिक्षिका व उद्योजिका रेश्मा जाधव, माजी सभापती अतुल पाटील आणि गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम उपस्थित होते. गट शिक्षणाधिकारी जयवंत नलवडे यांच्या प्रास्ताविकानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

स्वागतगीत व ईशस्तवन सुरताल संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केले. हार्मोनियमवर बाळासाहेब नरारे आणि तबल्यावर संतोष पोतदार यांनी साथसंगत केली. यावेळी शालेय गीते सादर करण्यात आली, तसेच बालिका प्रतिज्ञा गुंजाळ यांनी म्हणून घेतली.

कार्यक्रमात तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी मुलींना स्वावलंबी होण्याचे महत्व पटवून दिले. डॉ. सुनीता दोशी यांनी किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक समस्यांवर मार्गदर्शन केले. ॲड. अपर्णा पदमाळे यांनी कायद्याविषयी माहिती दिली, तर एपीआय गिरीजा म्हस्के यांनी आपल्या यशाचा अनुभव कथन करत मुलींना प्रेरणा दिली. माजी सभापती पाटील यांनी मेळाव्याला शुभेच्छा दिल्या, तर गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

मेळाव्यात वेशभूषा, सांस्कृतिक आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच सर्व मुलींना फुगे वाटप करून आनंद वाटला गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीतल बिरंगळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख राजकुमार खाडे यांनी केले. कार्यक्रमाला विस्तार अधिकारी नितीन कदम, मिनिनाथ टकले, केंद्र प्रमुख वैशाली महाजन, वंदना पांडव, रमाकांत गटकळ, संजय मुंढे, अमृत सोनवणे, निशांत खारगे, साईनाथ देवकर, श्रीरामे, महेश्वर कांबळे, विश्वास निरवण, संतोष पोतदार, हरिष कडू, अंजली निमकर, विषय तज्ञ ढेरे, डीडी जाधव, कालिदास जाधव, गणेश मुंढे, अशोक माने, रहिम शेख, शेंबडे यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप उत्साहात झाला, ज्यामध्ये विद्यार्थिनींना सशक्त बनवण्याचा संदेश दिला गेला.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# ईसापूर येथे रामकथेच्या निमित्ताने संस्कार केंद्रासाठी भूमिपूजन समारंभ उत्साहात संपन्न

**उमरखेड । प्रतीनीधी**



उमरखेड तालुक्यातील ईसापूर येथे वैकुंठवासी गुरुवर्य भिकाजी बाबा यांच्या पवित्र आश्रमाच्या परिसरात बालक आणि युवकांच्या शैक्षणिक, सामाजिक, आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी संस्कार केंद्र उभारण्यासाठी भूमिपूजन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या एकत्रित इच्छाशक्ती आणि परिश्रमाचे दृष्य स्पष्ट दिसून आले.भूमिपूजनाचा मान इसापूर गावच्या पोलीस पाटील सौ. संध्या ताई मारकवार यांना देण्यात आला. त्यांनी विधिवत पूजा करून भूमिपूजन संपन्न केले. या प्रसंगी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आवधूत मारकवार, किसन नाईक राठोड, भिवसिंग कारभारी, संजय पालतीया, संदेश मोरे, राजू मारकवार, नितूभया पांडे, पत्रकार संजय जाधव, विश्वास मारकवार, बाबूराव आढाव यांची उपस्थिती होती.

गावातील महिलांसह संपूर्ण गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाला सामूहिक सहभागाची चुणूक दिसून आली.संस्कार केंद्राची स्थापना ही गावासाठी एक मोठे पाऊल मानली जात आहे. हे केंद्र बालकांना आणि युवकांना जीवनमूल्ये, आध्यात्मिक मार्गदर्शन, आणि शिक्षणाच्या दिशेने प्रेरित करेल. केंद्राच्या स्थापनेसाठी गावकऱ्यांनी आर्थिक, मानसिक, आणि शारीरिक पातळीवर एकजूट दाखवत पुढाकार घेतला आहे.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, उपस्थित मान्यवरांनी एकत्रितपणे संस्कार केंद्राच्या माध्यमातून गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. यावेळी गुरुवर्य भिकाजी बाबा यांच्या कार्याची महती सांगून त्यांच्या योगदानाची आठवण करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पिढ्या घडल्या आहेत, हे अधोरेखित करण्यात आले.गावकऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. स्त्री-पुरुष, तरुण आणि वृद्ध सर्वांनीच आपापल्या भूमिकेतून योगदान दिले. या समारंभामुळे गावामध्ये एकात्मतेची भावना अधिक दृढ झाली.गावकरी, स्थानिक नेते, आणि पाहुण्यांनी संस्कार केंद्र हे गावाच्या प्रगतीचा मानबिंदू ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. या केंद्राद्वारे बालकांना शालेय शिक्षणाबरोबर जीवनमूल्यांचे पाठ मिळतील, तर युवकांना आध्यात्मिक आणि सामाजिक जाणिवा विकसित करता येतील.

इसापूर गावातील ही घटना फक्त एका भूमिपूजनाचा समारंभ नसून गावाच्या सामूहिक उन्नतीसाठी उचललेले पाऊल आहे. गुरुवर्य भिकाजी बाबांच्या पवित्र विचारांनी प्रेरित होऊन उभे राहणारे हे संस्कार केंद्र गावाच्या भावी पिढ्यांसाठी आदर्श ठरेल, याची खात्री उपस्थित सर्व मान्यवरांनी व्यक्त केली.

# शेतीच्या वादातून चिंचड गाव येथे तरुणाचा खून

## दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल

**वैजापूर, । प्रतिनिधी**

शेतातील बांधाच्या वादातून झालेल्या भांडणाने गंभीर वळण घेतले असून, चिंचडगाव येथे एका तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना ६ जानेवारी रोजी रात्री १० वाजता घडली. या प्रकरणी दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत व्यक्तीचे नाव सुनील कडूबा वाघ (वय ३०, रा. चिंचडगाव) असे असून, संशयित आरोपी विजय पुंजाहरी वाघ आणि पोपट उर्फ भावड्या लहानु वाघ (दोघेही रा. चिंचडगाव) अशी त्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेताच्या बांधाच्या वादातून सुनील कडूबा वाघ यांच्यावर विजय वाघ आणि पोपट वाघ यांनी लाठ्या, चापट आणि बुक्क्यांचा मारा करत गंभीर हल्ला केला. या हल्ल्यात सुनील वाघ गंभीर जखमी झाले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच विरगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी वैजापूरच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला.

हिम्मत नारायण भोसले (रा. भामठाण, ता. श्रीरामपूर) यांच्या तक्रारीवरून विजय वाघ आणि पोपट वाघ या दोघांविरुद्ध विरगाव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे करत आहेत. या घटनेमुळे चिंचडगाव गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतीशी संबंधित वादातून होणाऱ्या हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असून, या घटनेने गावकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. प्रशासनाने अशा वादांना वेळेत तोडगा काढण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# आंबेवाडी येथे पत्रकार दिन साजरा गावकऱ्यांकडून पत्रकारांचा सन्मान

**गंगापूर । प्रतिनिधी**



गंगापूर तालुक्यातील आंबेवाडी येथे पत्रकार दिनाचे औचित्य साधत गावकरी आणि समाजसेवक मंगेश साध्ये यांच्या वतीने स्थानिक पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. गावकऱ्यांनी एकत्रितपणे पत्रकार दिन साजरा करत पत्रकारितेच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या स्थानिक पत्रकारांना मान्यता दिली.

कार्यक्रमाची सुरुवात गावकऱ्यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करून झाली. यावेळी पत्रकार विजय बनसोड, सुनील झिंजूर्डे, अमोल आळंजकर, गणेश म्हैसमाळे, बाळासाहेब वाघमारे, सदाशिव जंगम, लक्ष्मण माघाडे, आणि सुभान शहा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात पत्रकारितेच्या समाजहितकारी भूमिकेवर विशेष भर देण्यात आला. भारतीय जनता युवा मोर्चाचे उपतालुकाध्यक्ष मंगेश साध्ये यांनी पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन करत पत्रकारांच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी पत्रकारांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे समाजात घडणाऱ्या बदलांवर भाष्य केले.

कार्यक्रमाला शरद पानकडे, दिलीप साध्ये, अविनाश पानकडे, बाळू राजपूत, सुरज राजपूत, स्वरूपचंद राजपूत, करण राजपूत, चंदन राजपूत, भारत राजपूत, किशोर पानकडे यांच्यासह गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या निमित्ताने पत्रकार दिनाचे महत्त्व विशद करण्यात आले. पत्रकार हे सत्य व पारदर्शकतेचे प्रतीक असून, समाजाच्या प्रगतीसाठी त्यांचे योगदान मोलाचे असते, असे मान्यवरांनी सांगितले.

या सन्मान सोहळ्यामुळे आंबेवाडी गावात पत्रकार दिनाचे औचित्य अधिक भावनिक आणि प्रेरणादायी ठरले. उपस्थित गावकऱ्यांनी पत्रकारांच्या कार्याला पाठिंबा देत, अशा उपक्रमांच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त

## पिंपळसुट्टी येथे अखेर नरभक्षक बिबट्या जेरबंद

# चार वर्षीय मुलीच्या दुर्दैवी मृत्यू नंतर वनविभागाची मोठी कारवाई

**शिरूर । प्रतिनिधी**



पिंपळसुट्टी (ता. शिरूर, जि. पुणे) येथे चार वर्षीय रक्षा अजय निकम हिच्यावर नरभक्षक बिबट्याने हल्ला केल्यानंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. वनविभागाने तातडीने केलेल्या प्रयत्नांमुळे अखेर या बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले आहे. २७ डिसेंबर २०२४ रोजी पिंपळसुट्टीतील घोडनदी काठावरील भिल्ल वस्तीजवळ चार वर्षांची रक्षा अजय निकम हिच्यावर बिबट्याने अचानक झडप घालून तिला नेले होते. या घटनेत रक्षाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची दखल घेत दैनिक सह्याद्रीचा राखणदार मध्ये विशेष बातमी प्रसिद्ध झाली होती.

या घटनेनंतर जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहाय्यक उपवनसंरक्षक अमृत शिंदे आणि त्यांच्या टीमने तातडीने घटनास्थळी भेट देऊन कारवाई सुरू केली. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तब्बल १६ पिंजरे व ट्रॅप लावण्यात आले. याशिवाय पीडित कुटुंबाला दहा लाख रुपयांची तातडीची मदत देण्यात आली.

वनविभागाच्या अथक प्रयत्नांमुळे अखेर नरभक्षक बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले. या कामगिरीबद्दल पिंपळसुट्टीचे सरपंच निर्मलाताई सुनील फलके, तंटामुक्ती अध्यक्ष भाऊसाहेब खळदकर, फत्तेसिंग वाबळे, शरदचंद्र वाघ (चेअरमन, वि. का. सोसायटी), शशिकांत वेताळ (माजी संचालक, घोडगंगा साखर कारखाना), माजी सरपंच नानासाहेब फलके, नितीन फलके आणि ग्रामस्थांनी वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते व त्यांच्या टीमचे आभार मानले.बिबट्या जेरबंद झाल्यामुळे पिंपळसुट्टीसह परिसरातील ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. वनविभागाच्या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे हा धोका टळला आहे.

# व्हॉईस ऑफ मीडिया बार्शीच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त पत्रकारांचा सन्मान

**बार्शी । प्रतिनिधी**



मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त व्हॉईस ऑफ मीडिया बार्शी शहर व तालुक्याच्या वतीने ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बार्शीचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, डिजिटल विंगचे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, राज्य सचिव इर्शाद शेख, वैद्यकीय अधिकारी डॉ. शीतल बोपलकर, ज्येष्ठ पत्रकार एन. आर. कुलकर्णी, अरुण बळप, माजी मुख्याधिकारी बप्पा पाटील, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष अमोल आजबे, शहर अध्यक्ष शाम थोरात आणि तालुका अध्यक्ष अस्लम काझी यांची उपस्थिती होती.

श्रीमती वैजयंती शंकर भिसे, रमेश रामराव गायकवाड, प्रशांत काळे, संजय बोकफोडे आणि आनंद डुरे या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. सन्मानित पत्रकारांनी आपल्या मनोगतातून पत्रकारितेच्या मूल्यांवर भर दिला आणि तरुण पत्रकारांना सत्य आणि निर्भीड पत्रकारितेची शिकवण दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साप्ताहिक विंगचे पश्चिम महाराष्ट्र संघटक संदीप आलाट यांनी केले, तर आभार प्रदर्शन शहर सचिव निलेश झिंगाडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडिया बार्शीचे विजय शिंगाडे, मयूर थोरात, ओंकार हिंगमिरे, समाधान चव्हाण, प्रदीप माळी, मल्लिकार्जुन धारूरकर, प्रविण पावले, जमीर कुरेशी, उमेश काळे, अपर्णा दळवी, गोविंद भिसे, विक्रांत पवार, भूषण देवकर, श्रीशैल्य माळी, संगीता पवार, सुवर्णा शिवपुरे, स्वप्नील पवार, निलेश उबाळे, सुशेन डमरे, राहुल भालशंकर, राहुल गुरव, मुजम्मिल कौठाळकर, सागर गरड, संतोष राजगुरू, असीफ मुलाणी, अजीम शेख, गणेश अडसूळ यांनी परिश्रम घेतले.

बार्शी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या सोहळ्याला उपस्थित राहून पत्रकारितेच्या सन्मानाला पाठिंबा दिला. पत्रकारितेचा हा सन्मान नव्या पिढीला प्रेरणा देईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# मोहोळ पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



**मोहोळ । प्रतिनिधी**

मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मोहोळ शासकीय विश्रामगृह येथे तालुक्यातील पत्रकार संघाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्रीरंग उन्हाळे होते, तर नूतन अध्यक्ष नसीर मोमीन व राजू साखरे यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत पत्रकार चंद्रकांत बरकडे यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.

यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांनी स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आणि पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या समाजप्रबोधनावर विचार मांडण्यात आले. त्यांच्या कार्याचा गौरव करताना राजू साखरे, नसीर मोमीन, अरुण भोसले, रफीक शेख, रजनीस कसबे, व दिनेश सातपुते यांनी आपल्या भाषणातून जांभेकरांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला हणमंत पवार, विलास पवार, दादाराव पवार, अशोक कांबळे, भैय्या कांबळे, नागेश देशपांडे, चेतन पाटील, नागेश पाटील, सचिन गवळी यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व पत्रकारांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार दिनेश सातपुते यांनी मानले.

# व्हाईस ऑफ मिडियाच्या वतीने दर्पण दिन साजरा

## पत्रकारांच्या विमा कवचाचा शुभारंभ

**गंगाखेड । प्रतिनिधी**



व्हाईस ऑफ मिडिया गंगाखेड शाखेच्या वतीने ६ जानेवारी रोजी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पत्रकारांसाठी पंधरा लाख रुपयांच्या विमा कवचाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील शासकीय विश्रामगृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात झारखंड येथील दिवंगत तरुण पत्रकार मुकेश चंद्रकार यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार दगडू सोमाणी यांनी भूषवले.

कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक दिपककुमार वाघमारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांसाठी विमा कवचाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी तालुकाध्यक्ष अन्वर शेख लिंबेकर यांनी पत्रकारांना रविवार १९ जानेवारी रोजी आयोजित होणाऱ्या दर्पण दिन सोहळ्याबाबत माहिती देत उपस्थित राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात दगडू सोमाणी यांच्या वतीने उपस्थित पत्रकारांना टॉवेल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विमा कवच उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. तसेच, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी व्हाईस ऑफ मिडियाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेस आमदाराची आरटीओ कार्यालयात 'गांधीगिरी'; अधिकारी खजील!

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**



शेतकऱ्यांच्या मालवाहतूक वाहनांवर दंड केल्याने काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले आणि युवा नेते करण ससाणे यांनी आरटीओ कार्यालयात 'गांधीगिरी' करत अधिकाऱ्यांना चांगलेच खजील केले. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणारी ही 'गांधीगिरी' सध्या चर्चेत आहे.

श्रीरामपूर आरटीओ अधिकाऱ्यांनी एका शेतकरी कंपनीच्या वाहनावर ओव्हरलोडसाठी ३५,००० रुपयांचा दंड लावला. याची माहिती मिळताच आमदार हेमंत ओगले यांनी युवा नेते करण ससाणे आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह आरटीओ कार्यालय गाठले.

आरटीओ अधिकाऱ्यांकडून कारवाईची माहिती घेतल्यानंतर आमदार ओगले यांनी संताप व्यक्त केला. मात्र, प्रत्यक्ष राग व्यक्त करण्याऐवजी त्यांनी अधिकारी वर्गाचा सत्कार करून 'गांधीगिरी' केली. शेतकऱ्यांच्या वाहनांवर तत्परतेने कारवाई करता, पण अवैध वाळू आणि मुरूम वाहतुकीकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करता. ही गोष्ट खपवून घेणार नाही, असा इशारा त्यांनी अधिकाऱ्यांना दिला. आमदार ओगले यांनी अवैध वाळू व मुरूम वाहतुकीच्या ओव्हरलोड वाहनांवर तातडीने कारवाईची मागणी केली. गोरगरीब शेतकऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून त्रास देणे बंद करा. अवैध वाहतूक करणाऱ्या प्रवृत्तींकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

करण ससाणे यांनीही अधिकाऱ्यांना धारेवर धरत, शेतकरी कंपनीच्या वाहनावर तत्परतेने कारवाई केली, पण विनानंबर अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांबाबत तीच तत्परता दाखवणार का? असा सवाल उपस्थित केला.

या वेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, काँग्रेस शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, मार्केट कमिटीचे संचालक राजेंद्र पाऊलबुधे यांसह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. आमदार ओगले यांच्या 'गांधीगिरी'मुळे आरटीओ अधिकारी खजील झाले असून या प्रकरणामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शेतकऱ्यांसाठी आवाज उठवणारी ही घटना आता चर्चेचा विषय ठरली आहे.

# लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय पंचवटी नाशिकचे दरी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन

**नाशिक । प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यमंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पंचवटी, नाशिक यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दरी गावात ७ ते १३ जानेवारी २०२५ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. सुचेता सोनवणे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सचिन पवार आणि सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. एन. जी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. सतीश तांबे, डॉ. राकेश पाटील, डॉ. प्रकाश शेवाळे, प्रा. किशोर राजगुरू, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. पी. पगार, डॉ. ए. पी. वनारसे, डॉ. ॲग्नेस खरात, प्रा. विलास खैरनार, प्रा. विमल शिंदे, अनेक ग्रामस्थ आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होतेकार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. डॉ. ॲग्नेस खरात यांनी मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. यानंतर स्वयंसेवक विजय काकडे यांनी स्वागतगीत सादर केले.डॉ. एम. पी. पगार यांनी शिबिराचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, एनएसएस स्वयंसेवक दरी गावाच्या स्वच्छतेसाठी तसेच दीर्घकालीन विकासासाठी शंभर टक्के प्रयत्न करतील. शिबिरात ग्राम सर्वेक्षण, वृक्षारोपण, रस्ते सुरक्षा, मतदार जनजागृती, आरोग्य विषयक जनजागृती, डिजिटल साक्षरता, आणि ग्रामस्थांशी संवाद यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ग्रामपंचायत अधिकारी सचिन पवार यांनी शिबिराच्या महत्त्वावर भाष्य करत, समाजाच्या शाश्वत विकासासाठी आणि ग्रामविकासासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. त्यांनी दरी गावासाठी उपयुक्त ठरतील असे उपक्रम राबविण्याविषयी मार्गदर्शन केले.उपप्राचार्य डॉ. सुचेता सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात, स्वयंसेवकांनी स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा, कठोर परिश्रमाने कार्य करावे आणि महिलांचे सक्षमीकरण तसेच राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे, असे आवाहन केले.डॉ. एन. जी. पाटील यांनी शिबिराच्या कामकाजाचे प्राथमिक नियोजन सादर करत, स्वयंसेवकांनी प्रामाणिकपणे काम करावे, असा सल्ला दिला.कार्यक्रमाचा समारोप डॉ. ए. पी. वनारसे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. सूत्रसंचालन डॉ. ॲग्नेस खरात यांनी केले.



# वर्ध्यात पहिल्यांदाच तपकिरी रंगाच्या कापसाची खादी; नैसर्गिक शेतीत नवा प्रयोग



**वर्धा । प्रतिनिधी**

नैसर्गिक शेती आणि खादी उद्योगाच्या संगमातून वर्ध्यातील मगन संग्रहालयाने एक अनोखा प्रयोग हाती घेतला आहे. नैसर्गिक शेती विकास केंद्राच्या अंतर्गत शेतकऱ्यांनी रंगीत कापसाचे यशस्वी उत्पादन घेतले असून, या कापसापासून खादी तयार केली जाणार आहे. वर्ध्यात रंगीत कापसापासून खादी निर्मितीचा हा पहिलाच प्रयोग असल्याचे खादी विभागाचे प्रमुख मुकेश लुतडे यांनी सांगितले.गिरड येथील नैसर्गिक शेती विकास केंद्रामार्फत नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेकडून तपकिरी कापसाचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले. पाच एकर जमिनीत प्रायोगिक तत्त्वावर लागवड करण्यात आली. रासायनिक कीडनाशकांचा वापर न करता नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या कापसाला उत्तम दर्जा लाभला आहे. सरासरी एकरी ८ क्विंटल कापूस उत्पादन मिळण्याचा अंदाज असल्याचे शेतकरी चक्रधर भगत यांनी सांगितले.

### नैसर्गिक खादी निर्मिती

**मगन संग्रहालयाच्या खादी उत्पादन विभागाने या कापसाचा नैसर्गिक रंग कायम ठेवून खादीच्या कपड्यांची निर्मिती करण्याचा संकल्प केला आहे. खादी हातमागावर तयार होत असून कृत्रिम रंगांचा वापर न करता नैसर्गिक रंगीत खादीचा हा प्रकल्प आहे.**

### वैश्विक बाजारपेठेचे लक्ष्य

**रंगीत कापसाला वस्त्रोद्योग आणि वैद्यकीय क्षेत्रात मोठा वाव आहे. प्रभावी ब्रँडिंग व सक्षम बाजारपेठ मिळाल्यास भारतीय कापूस उत्पादकांना जागतिक स्तरावर संधी उपलब्ध होईल, असे मत केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक वाय. जी. प्रसाद यांनी व्यक्त केले.**

### नैसर्गिक खादीला प्रोत्साहन

**रासायनिक प्रक्रियेशिवाय पिकवलेल्या कापसाला मोठ्या उद्योगांपेक्षा हातमाग आणि खादी निर्मिती संस्थांकडून प्रोत्साहन दिल्यास नैसर्गिक खादीला सुवर्णयुग येईल. या प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य व नव्या संधी मिळणार आहेत.वर्ध्यातील हा प्रयोग नैसर्गिक शेती आणि खादी उद्योगाच्या क्षेत्रात एक नवी दिशा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

# अपार आयडीचा दबाव: पालकांचा विरोध,शाळांचे षड्यंत्राच्या शंकेवर सवाल



**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील शाळांमध्ये शिक्षण मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार ऐच्छिक असलेली अपार आयडी अनिवार्य केल्याचा प्रकार समोर येत आहे. शाळा व महाविद्यालयांतील शिक्षक व संबंधित अधिकारी अप्रत्यक्षपणे पालकांवर दबाव आणून विद्यार्थ्यांकडून अपार आयडीसाठी फॉर्म भरून घेत आहेत. याला विनोद विद्यालय टेकेपार (डोडामाझरी) येथील विद्यार्थी व पालकांनी कडाडून विरोध केला आहे.

शाळेच्या प्राचार्यांना हरकत पत्र देऊन अपार आयडीबाबत नाराजी व्यक्त केली असून, या विरोधात निवेदन दिले आहे. निवेदनात सहभागी असलेल्या पालकांमध्ये सुशांत शामकुवर, निशा दिनकर, धंम्मदिपा गोस्वामी, वनमाला लोनारे, सोनाली खोब्रागडे, राजेश गोस्वामी, सविता कंगाले, लता चामलाटे यांचा समावेश आहे.

शासनाने शिक्षक व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या एका परिपत्रकात, अपार आयडी १०० टक्के पूर्ण करा अन्यथा वेतन रोखले जाईल, असे नमूद केल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे पालक वर्ग व विद्यार्थ्यांमध्ये संतापाची भावना असून, या प्रकरणाचा तपास होण्याची मागणी केली जात आहे.सामाजिक कार्यकर्ते अभय डी. रंगारी यांनी यासंदर्भात मत व्यक्त करताना, अपार आयडी हे शिक्षण व्यवस्थेत घडणारे संभाव्य षड्यंत्र असू शकते, असा इशारा दिला आहे. यामुळे पालक, विद्यार्थी व शिक्षकांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.या प्रकरणावर शासनाने लवकरात लवकर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सामान्य जनतेकडून केली जात आहे. अपार आयडीचा उद्देश व उपयोग याबाबत शासनाने खुलासा करावा, असेही मत मांडले जात आहे.

# भामरागड मधील शेतकऱ्यांना मिळाले आधुनिक शेतीचे धडे

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे, कृषी विभाग गडचिरोली व कृषी विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय निवासी शेडनेट हाऊस व लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रज्ञा गोळभाटे, स्मार्ट विभागीय नोडल अधिकारी,नागपूर विभाग, प्रीती हिरळकर ,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,गडचिरोली, हेमंत जगताप,वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी,महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ,पुणे, किशोर बागडे,तहसीलदार, भामरागड, डॉ. किशोर झाडे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र,सोनापूर,गडचिरोली, अर्चना कोचर, स्मार्ट नागपूर, कुणाल राऊत,तालुका कृषी अधिकारी,भामरागड इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत आज तहसील कार्यालय भामरागड जिल्हा गडचिरोली येथे पार पडले.




सुरुवातीला हेमंत जगताप वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे यांनी आपल्या प्रास्ताविकात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत प्रथमच अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम भामरागड येथे आयोजित करण्यात येत असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी श्रीमती हिरळकर यांनी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत विविध विषयांचे प्रशिक्षण दरवर्षी आयोजित केली जातात व यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पुणे किंवा इतर भागांमध्ये जावे लागते, परंतु प्रथमच भामरागड या भागामध्ये अशा प्रकारचे प्रशिक्षण घेतल्यामुळे येथील शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान व त्यामधील भाजीपाला लागवड याविषयी शास्त्रीय पद्धतीने तज्ञ व्यक्तींकडून मिळणाऱ्या माहितीचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. किशोर बागडे तहसीलदार भामरागड यांनी अशा प्रकारे प्रशिक्षण महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने भामरागड येथे घेतल्याबद्दल आभार मानले व जास्तीत जास्त अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम या ठिकाणी घेण्यात यावे असे सूचित केले. श्रीमती गोळघाटे यांनी यापुढे शेतकऱ्याने पिकांमध्ये बदल करणे आवश्यक असून, शेतीमध्ये नवीन प्रयोग करणे गरजेचे असल्याचे सांगितले व त्यासाठी आवश्यक ती सर्व मदत शासनाकडून करण्यात येईल असे सूचित केले. डॉक्टर किशोर झाडे यांनी भामरागड मधील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या सोयी सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. आनंद गंजेवार,उपविभागीय कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना भविष्यामध्ये येथील शेतीतील मालाला मार्केटिंग मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत जगताप यांनी तर आभार प्रदर्शन कुणाल राऊत यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्याकरता कृषी विभाग भामरागडचे सहकार्य लाभले.

# जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचा समारोप

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभागारतर्गत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय गडचिरोली यांच्या वतीने जिल्हयात कार्यरत असणाऱ्या बालगृहातील मुलींच्या कला गुणांना वाव मिळून त्यांचा सर्वांगिन विकास होण्याच्या दुष्टीने जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव क्रिडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन दिनांक ०१ जानेवारी पासून अहिल्यादेवी बालसदन घोट ता, चामोशी जि. गडचिरोली येथे करण्यात आले होते. त्याचा ०३ जानेवारी ला समारोप करण्यात आला.

सदर बाल महोत्सवात जिल्हयातील अहिल्यादेवी वालसदन घोट व मातोश्री रमाबाई मुलीचे बालगृह व निरिक्षणगृह गडचिरोली येथील प्रवेशित चालिका तसेच, स्थानिक शाळामधील पी.एम.श्री. जवाहर नवोदय विदयालय घोट, नवोदय मराठी उच्च प्राथमिक हॉयस्कूल घोट, परमपूज्य महात्मा गांधी विदयालय घोट, जि. प. महात्मा गांधी हॉयस्कुल घोट, येथील मुली व तालुकास्तरावर क्रांती ज्योती सावित्रीबाई बालसंगोपन योजनावर कार्य करणाऱ्या संस्था सुरक्षा बहुउददेशिय संस्था सिरोंचा, आरोग्य प्रबोधनी संस्था वडसा, पदमावती बहुउददेशिय ग्रामीण विकास संस्था गडचिरोली, आंयकान बहुउददेशिय संस्था गडचिराला, क्रातिज्योती सावित्राबाई फुल बालसंगोपन केंद्र कोरची, आदिवासी विकास संस्था वडसा, आदिवासी विकास शिक्षण संस्था मुलचेरा मधील काळजी व संरक्षाची गरज असणारी वालके यांचा सहभाग करुन त्याच्यासाठी कब्बडी स्पर्धा, १०० मीटर धावने, रांगोळी स्पर्धा, चित्रकला, मडका फोड, लिंबु चमचा, सामान्य ज्ञान, एकल नृत्य, सामुहिक नृत्य, एकल गायन, सामुहिक गायन, इत्यादी स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये एकूण २७० स्पर्धक सहभाग होवून आपल्यामधील कला गुणांना वाव देवून आनंद व्दिगुणीत करण्यात आला.अहिल्यादेवी बाल सदन घोट येथील बालीकांनी ११ पदके, पी.एम.श्री. जवाहर नवोदय विदयालय येथील बालिकांनी १० पदके, परमपुज्य महात्मा गांधी विदयालय येथील बालिकांनी ४ पदके, जि. प. महात्मा गांधी हाँयस्कुल येथील बालिकांनी ४ पदके, नवोदय मराठी हाँयस्कुल येथील वालिकानी ३ पदके, आरोग्य प्रबोधनी संस्था वडसा येथील बालिकांनी ३ पदके, पदमावती बहुउददेशिय ग्रामीण विकास संस्था गडचिरोली येथील बालिकांनी २ पदके, सुरक्षा बहुउददेशिय संस्था सिरोचा व ऑयकान बहुउददेशिय संस्था गडचिरोली व क्रातिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन केंद्र कोरची, व आदिवासी विकास संस्था वडसा, येथिल बालीकानी प्रत्येक एक पदके मिळवली. समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मोहनिश शेजवळकर तहसिलदार (संजय गांधी योजना जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली) प्रमुख अतिथी राजन गजभिये प्राचार्य केंद्रीय नवोदय विदयालय घोट, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष श्रीमती वर्षा मनवर, सदस्य दिनेश बोरकुटे, डॉ. काशीनाथ देवगडे, ग्रामपंचाय घोट येथील सरपंच श्रीमती रुपाली दुधबावरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गडचिरोली प्रकाश भांदककर, बाल विकास प्रकल्प अधिकारी विनोद हटकर, लोककल्याण बहुउददेशिय शिक्षण संस्थेचे पुरुपोषत्तम चौधरी, लोकमंगल संस्थेचे सचिव मर्लीन मॅडम, सामाजिक कार्यकर्त्य रुपा शहा घोट, जिल्हा परिविक्षा अधिकारी विनोद पाटील, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अविनाश गुरनुले, सारीका वंजारी विधी सल्लागार अधिकारी, रुपाली काळे संरक्षण अधिकारी, शासकीय निरिक्षणगृह व बालगृह अधिक्षक महेश रनदिवे, अनुप माझी, किर्तोणीया सर, काजल बिश्वास उपस्थित होते. तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्षातील अधिकारी व कर्मचारी तसेच चाईल्ड लॉइन कर्मचारी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले.

# अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी मिनी ट्रॅक्टर योजना

## अर्ज ३१ जानेवारीपर्यंत स्वीकारले जाणार

**वर्धा । प्रतिनिधी**

फअनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर आणि त्याची उपसाधने जसे की कल्टीवेटर, रोटावेटर, आणि ट्रेलर यांचा पुरवठा करण्यासाठी शासनाने विशेष योजना जाहीर केली आहे. या योजनेसाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५ आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी दिली.

बचत गट शासकीय यंत्रणेकडून नोंदणीकृत असावा. गटाच्या नावावर बँक खाते असणे आवश्यक आहे, तसेच खाते आधार कार्डशी संलग्न असावे. गटामध्ये किमान ८०% सदस्य अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकांचे असावेत आणि सर्व सदस्य महाराष्ट्राचे रहिवासी असावेत.

अर्जासोबत जात प्रमाणपत्र, राशन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्र जोडणे बंधनकारक आहे. गटाचे अध्यक्ष आणि सचिव हे अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकांतील असणे आवश्यक आहे.

मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांच्या खरेदीसाठी कमाल मर्यादा ३.५० लाख असेल. बचत गटाला १०% स्वहिस्सा भरावा लागेल. ट्रॅक्टर व ट्रेलरची नोंदणी, स्थानिक जकात कर (लागू असल्यास) गटाला स्वतः भरावा लागेल. गटाने सदस्यांची तपशीलवार यादी आणि ट्रॅक्टर खरेदीचा ठराव अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.

या योजनेमुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटांना शेतीसाठी आधुनिक साधने उपलब्ध होऊन उत्पादनक्षमता वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# संगणक परिचालक संघटनेच्या उमरखेड तालुकाध्यक्षपदी देवेंद्र चव्हाण यांची निवड

**उमरखेड । प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यातील संगणक परिचालकांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या संगणक परिचालक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी देवेंद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी सुमेध नवसागरे आणि राहुल काळबांडे यांची तर सचिवपदी शिवशंकर सुरोशे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या कोषाध्यक्षपदी राजू वानखेडे, महिला आघाडी प्रमुखपदी क्रांती धोंगडे, संघटकपदी शंकर चंद्रवंशी, प्रसिद्धी प्रमुखपदी अजबराव चारोळे आणि गणेश राठोड यांची निवड करण्यात आली आहे.



ग्रामपंचायत स्तरावर डिजिटल इंडिया योजनेचा अंमलबजावणी करणारे संगणक परिचालक हे ग्रामीण भागातील नागरिकांना सरकारी सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत. मात्र गेल्या तेरा वर्षांपासून हे परिचालक अत्यल्प मानधनावर काम करत असून त्यांच्या विविध मागण्यांसाठी संघटनेने वारंवार आंदोलन केले आहे. नागपूर, मुंबई, जिल्हा आणि तालुका कार्यालयांमध्ये आंदोलने करूनही त्यांची कामगार म्हणून मान्यता, स्थिर नोकरी आणि योग्य वेतन यांसारख्या मागण्या अजूनही प्रलंबित आहेत.

संघटनेच्या कार्यकारिणीत सल्लागारपदी अमोल देवराये, विठ्ठल मोरे, आणि देविदास राठोड यांची निवड झाली आहे. सदस्य म्हणून शंकर शिंदे, शफिक पिंजारी, संदेश धुळे, सचिन सकर्गे, विराजी हनवते, अनंता चव्हाण, अविनाश चव्हाण, चेतना श्रीवास्तव, शीतल चव्हाण, आशा काळे, निखील वानखेडे, बजरंग बद्रवाल, गोपाल वानखेडे, बालाजी श्रीसागर, विजय कोल्हे, मीरा अंबेकर, सुरेश राठोड, निरंजन राठोड, गजानन पुरी, तेजस करेवाड, आणि विनायक राप्रती यांची निवड करण्यात आली आहे.

तालुकाध्यक्ष देवेंद्र चव्हाण यांनी सर्व संगणक परिचालकांना एकजूट ठेवण्याचे आवाहन केले असून, संघटनेच्या मागण्यांसाठी तीव्र लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. यावेळी तालुक्यातील सर्व संगणक परिचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटनेने भविष्यात आपल्या मागण्यांसाठी अधिक ठोस आणि प्रभावी योजना आखण्याचे आश्वासन दिले आहे.

# २१ हजार रूग्णांची नेत्र तपासणी!

## १८ हजार ४८१ चष्मेवाटप,२ हजार ६४९ शस्त्रक्रिया

**पारनेर | प्रतिनिधी**

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने पारनेर-नगर मतदारसंघात आयोजित करण्यात आलेल्या नेत्रतपासणी शिबिरात २१ हजार १९४ रूग्णांची तपासणी करण्यात येऊन १८ हजार ४८१ रूग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. २ हजार ६४९ रूग्णांचे मोतीबिंदूचे निदान झाले असून दररोज ३० रूग्णांवर पुण्यात शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. खासदार नीलेश लंके व राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून दि. १२ डिसेंबरपासून मोफत नेत्र तपासणी, चष्मा वाटप व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी पारनेर नगर मतदारसंघातील शिबिरांचा समारोप झाला.

दि.१२ डिसेंबर रोजी पारनेर येथे गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण करण्यात आल्यानंतर बाभुळवाडे व वडझिरे येथे मोफत नेत्रतपासणी शिबिरास प्रारंभ झाला. त्यानंतर जवळे, लोणीमावळा, निंबळक, अळकुटी, राळेगणथेरपाळ, वाडेगव्हाण, राळेगणसिध्दी, निघोज, कर्जुले हर्या, कान्हूरपठार, रांजणगांवमशिद, रूईछत्रपती, खडकवाडी, ढवळपुरी, नांदूरपठार, सावरगांव, पिंपळगांवरोठा, पुणेवाडी, पारनेर, मांडवेखुर्द, गोरेगांव, दैठणे गुंजाळ, टाकळीढोकेश्वर, सुपा, नेप्ती, काताळवेढा, पळसपुर, पळशी, देहरे, जातेगांव, चास, सारोळा कासार, अरणगांव, वाकोडी, शिंगवे नाईक, भाळवणी, अकोळनेर, देऊळगांव सिध्दी, कामरगांव, टाकळीखातगांव, नवनागापुर, पोखरी व वनकुटे येथे शिबिरे पार पडली. या गावांच्या परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. प्रत्येक गावामधील शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. नेत्र तपासणीनंतर रूग्णांना तात्काळ चष्म्याचे मोफत वितरण करण्यात आले तर मोतीबिंदूचे निदान झालेल्या रूग्णांवर दररोज ३० याप्रमाणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत.



● पोखरी येथील नेत्रतपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद लाभला.

### गरजू, वंचितांची सेवा करण्याचे भाग्य लाभले

**लोकांच्या चेहऱ्यावर हसू आणणे आणि त्यांच्या अडचणी समजून घेणे हेच माझ्यासाठी सर्वात मोठं समाधान आहे. जनतेच्या सेवेसाठी माझा प्रत्येक क्षण समर्पित आहे. आरोग्य सेवा असो किंवा इतर कोणतीही गरज, मी नेहमीच जनतेसोबत आहे. जनतेच्या प्रेमावर आणि विश्वासावर माझे कार्य उभे आहे. हे कार्य असेच सुरू राहणार आहे. मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या माध्यमातून गरजू, वंचित रूग्णांची सेवा करण्याचे भाग्य लाभले.**

### लोकसभा मतदारसंघात शिबिरे

**पारनेर-नगर मतदार संघात नेत्र तपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद लाभल्यानंतर आता नगर लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ही शिबिरे घेण्यात येणार आहेत. पारनेर नंतर आता पाथर्डी-शेवगांव मतदारसंघात शिबिर घेण्यात येणार असून त्यानंतर श्रीगोंदे, कर्जत, जामखेड, राहुरी व नगर शहरात ही शिबिरे घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.**

**-खासदार नीलेश लंके ,लोकसभा सदस्य**

# ग्रामीण व शहरी जीवनाच्या समस्यांचे निरिक्षण करून पत्रकारांनी विकासाची नवी दिशा दाखवावी-बधान

**पिंपळनेर | प्रतिनिधी**

पत्रकार हा लोकशिक्षक असून समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य करतो. समाजातील विविध समस्यांचा अभ्यास करून निर्भीडपणे आणि निपक्षपातीपणे पत्रकारिता करणे ही पत्रकारांची जबाबदारी आहे. लेखणीच्या माध्यमातून अन्यायाला वाचा फोडत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिप्रेत असलेली पत्रकारिता समाजासमोर आणावी, असे प्रतिपादन शांताई एज्युकेशन सोसायटीचे व सेयान इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचे संस्थापक दिलीप शिवराम बधान यांनी केले.

ते येथे आयोजित मराठी पत्रकार दिन कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. पिंपळनेर पत्रकार संघटना व साक्री तालुका व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेतर्फे सेयान इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात मराठी पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमात पोलीस निरीक्षक भूषण शेवाळे, शांताई एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी संचालक रुपेश बधान, व्हॉइस ऑफ मीडियाचे साक्री तालुका अध्यक्ष राजेंद्र गवळी, कार्याध्यक्ष विशाल गांगुर्डे, पत्रकार मोतीलाल पोतदार, उमाकांत अहिरराव, प्राचार्य गणेश अहिरे, फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. राकेश जाधव, प्रा. गणेश खैरनार, प्रा. अश्विनी पगारे , प्रा. संदीप पगारे तसेच प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाचे साक्री तालुका अध्यक्ष राजेंद्र गवळी, कार्याध्यक्ष विशाल गांगुर्डे, मोतीलाल पोतदार, उमाकांत अहिरराव यांनी पत्रकार दिनानिमित्त आपली मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाची सूत्रसंचालन प्रा. आकांक्षा दशपुते यांनी केली, तर उपस्थित मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. राकेश जाधव यांनी आभार मानले.

# तळोधी (बा.) येथे मराठी पत्रकार दिन उत्साहात साजरा

**तळोधी (बा.) | प्रतिनिधी**

तळोधी (बा.) पत्रकार संघ आणि पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (६ जानेवारी) मराठी पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम तळोधी (बा.) पोलीस स्टेशनच्या परिसरात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात मराठी वृत्तपत्रांचे जनक आणि आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सभापती खोजराम मरसकोल्हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे, पोलीस उपनिरीक्षक किशोर मानकर आणि चंद्रकांत लांबट उपस्थित होते.



तळोधी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष गोकुल पाकमोडे, सल्लागार पंढरीनाथ बांडे, सचिव योगेश्वर शेंडे, सहसचिव तुलोपचंद गेडाम, कोषाध्यक्ष सुभाष गजभे, सदस्य प्रणय बांगरे आणि निरंजन बोरकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.सल्लागार पंढरीनाथ बांडे यांनी मराठी पत्रकार दिनाची महत्त्वाची पार्श्वभूमी सांगितली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे यांनी पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचे सांगून निर्भीड पत्रकारितेचे महत्त्व स्पष्ट केले. पोलीस उपनिरीक्षक किशोर मानकर यांनी पत्रकार आणि पोलीस यांच्यात समन्वय असण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष खोजराम मरसकोल्हे यांनी पत्रकारांसाठी सुरक्षा पुरवली जाण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान तळोधी (बा.) पोलीस स्टेशनतर्फे सर्व पत्रकारांना पेन आणि डायरी देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी पोलीस पाटील अपूर्वा मेश्राम आणि पोलीस कर्मचारी देखील उपस्थित होते.मराठी पत्रकार दिनाचा हा कार्यक्रम पत्रकारितेच्या महत्त्वावर प्रकाश टाकत सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या पत्रकारांना प्रोत्साहन देणारा ठरला.

# आठवडी बाजार बंद करा; बदलापूर भाजी विक्रेत्यांचा पालिकेवर धडक मोर्चा

**बदलापूर | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या आठवडी बाजारांविरोधात स्थानिक भाजी विक्रेत्यांनी आवाज उठवत कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेवर धडक मोर्चा काढला. बहुजन मुक्ती पार्टीच्या निलेश येलवे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला.



शहरात वाढत्या गृहसंकुल प्रकल्पांमुळे स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांची संख्या झपाट्याने वाढत आहे. परिणामी, बाजारपेठ आणि फिरत्या विक्रेत्यांची संख्या वाढली आहे. त्यातच, शहरातील विविध भागांत आठवड्याचे वेगवेगळे बाजार सुरू झाले आहेत. मध्यमवर्गीय नागरिकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या बाजारांना मोठा प्रतिसाद मिळत असला, तरी स्थानिक भाजी विक्रेत्यांवर मोठा परिणाम झाला आहे.

या आठवडी बाजारांमुळे नियमित भाजी विक्रेत्यांचा व्यवसाय घटला आहे. तसेच भांडी, कपडे आणि इतर वस्तू विक्रेत्यांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. याविरोधात भाजी विक्रेत्यांनी गेल्या आठवड्यात आंदोलनाचा इशारा दिला होता. आठवडी बाजारांवर कारवाई करून ते बंद करण्याची आमची मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील. अन्यथा, आम्ही आमरण उपोषणाला बसू, असा इशारा भाजी विक्रेता संघाचे अध्यक्ष सुरेश उर्फ मामा जवळेकर आणि निलेश येलवे यांनी दिला. स्थानिक नागरिक मात्र या आठवडी बाजारांचे समर्थन करत आहेत. स्टेशनपरिसरात जाण्यापेक्षा या बाजारांमधून भाजीपाल्याची खरेदी सोयीस्कर आणि परवडणारी ठरते, असे नागरिकांनी सांगितले.

या बाजारांना स्थानिक लोकप्रतिनिधींचा पाठिंबा असल्याचा आरोप विक्रेत्यांनी केला आहे. शहरातील बेकायदेशीर आठवडी बाजारांवर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी मोर्चादरम्यान करण्यात आली. पालिकेने यावर काय तोडगा काढतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिरूर तालुक्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले

**शिरूर | प्रतिनिधी**

शिरूर तालुका, जो पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा तालुका आहे, येथे सध्या अनेक घटनांमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील रांजणगाव गणपती एमआयडीसी आणि कर्डे येथील नव्या एमआयडीसी मुळे औद्योगिक विकास गतीमान झाला असला तरी, गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे.

शिरूर तालुक्यातील गुन्हेगारी घटनांचे प्रमाण मागील काही महिन्यांपासून वाढले आहे. विशेषतः काही गुन्ह्यांची नोंद पोलिसांत केली जात नाही, कारण काही नागरिक आपल्या नावाच्या खराब होण्याच्या भीतीने पुढे येत नाहीत. याचा फायदा गुन्हेगार उचलत आहेत. यासाठी शिरूर पोलिस प्रशासनाने गुन्हेगारी रोखण्यासाठी उपाययोजना सुरू केली आहे.

शिरूर तालुक्यातील स्टेट बँक कॉलोनी परिसरात तीन अज्ञात युवकांनी घरात घुसून महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिलेने आरडा-ओरडा केल्यामुळे चोर पळून गेले. शिरूर पोलिसांनी या अज्ञात चोरांवर गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण तपास करत आहेत.

रांजणगाव सांडस येथील आरती पाटोळे या महिलेवर तिच्या पती, नणंद आणि सासू यांनी शारीरिक हिंसा केली. या घटनेनंतर शिरूर पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सहाय्यक निरीक्षक राजेंद्र बनकर या प्रकरणाचा तपास करत आहेत.शिरूर तालुक्यातील या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना पसरली आहे. पोलिस प्रशासनाने या गुन्हेगारी घटनांचे गंभीरतेने घेतले असून, जनतेला सुरक्षिततेसाठी योग्य उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे.

# विकास कामांना गती देणेसाठी पत्रकारांचे मोठे योगदान-सिईओ कुलदिप जंगम



**सोलापूर | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जनतेला सुविधा देणेसाठी आपण कटीबध्द आहोत. जिल्हा परिषदेच्या विकासाला गती देण्यासाठी पत्रकारांचे मोठे योगदान आहे . असे मत जिल्हा परिषद सीई ओ कुलदिप जंगम यांनी केले.

जिल्हा परिषदेत मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर प्रतिमेचे पूजन कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आले. सीईओ जंगम यांच्या हस्ते मान्यवर पत्रकारांचा शाल व पेन डायरी देऊन सन्मान करणेत आला. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, सोलापूर जिल्हा परिषद पत्रकार संघाचे अध्यक्ष शेखर गोतसुर्वे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके, सचिव रवि बगले, खजिनदार मनोज भालेराव यांची प्रमुख उपस्थित होती .

जिल्हा परिषद पत्रकार संघाचे अध्यक्ष शेखर गोतसुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकारांचा सन्मान जिल्हा परिषद प्रशासनाने केला आहे. सिईओ जंगम यांनी अल्पावधीत विकास कामांना गती दिली आहे. झिरो पेडन्सी चे आदर्श काम करणारे सिईओ जंगम यांच्या कार्याचा गौरव केला.

राज्य अधिस्विकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके यांनी पत्रकारांच्या कार्याची दखल जिल्हा परिषद घेत आली आहे. पुरस्कार योजना पुढे कार्यरत ठेवण्यात विनंती करून प्रशासनाच्या कामाचे कौतुक केले.

या कार्यक्रम साठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शना खाली स्वीयसहाय्यक सुधाकर माने-देशमुख,सहाय्यक प्रशासन अधिकारी अनिल जगताप, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन साळुंखे, सिईओ कक्षातील वरिष्ठ सहाय्यक सुरज नदाफ, कनिष्ठ सहाय्यक नरेंद्र अकीले यांनी कार्यक्रम यशस्वी करणे साठी परिश्रम घेतले. प्रास्तविक व सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. संवाद सल्लागार सचिन सोनवणे , जनसंपर्क कक्षातील सहाय्यक मेहताब शेख यांनी आभार मानले.

### धोरणात्मक कामासाठी पुढे राहूयात-सिईओ कुलदीप जंगम

**जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विकास या एकाच ध्येया साठी आपण सर्वजण मिळून काम करीत आहोत. लोकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात. ज्या गोरगरीब जनते पर्यंत सुविधा पोहचू शकत नाही त्यांच्या पर्यंत माहिती देण्याचे काम पत्रकार करतात. कर्मचारी यांचे कडून माहिती येणे पुर्वी पत्रकाराकडून माहिती अगोदर मिळते. आम्ही तुम्हाला सोडू शकत नाही. पत्रकार आम्हाला सोडू शकत नाहीत. विकासाला दिशा देणे साठी सहकार्य करा. आम्ही आमच्या कार्यपद्धतीत सुधारणा करू अशी ग्वाही देत विकास कामात पत्रकारांचे योगदान खुप मोठे आहे असेही सिईओ कुलदीप जंगम यांनी सांगितले.**

### सकारात्मक संकल्पना निदर्शनास आणा अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर

**सध्या जिल्हा परिषदेचे पदाधिकारी नसल्याने पत्रकार हेच कान व डोळे आहेत. क्षेत्रीय स्तरावर काय घडते याचा फिडबॅक देणेचे काम पत्रकार करतात. सर्वजण जिल्हा परिषदेच्या विकास कामा साठी एकत्र येऊन काम करतो. परंतू काम करीत असताना सकारात्मक चांगल्या संकल्पना निदर्शनास आणून द्या असे आवाहन अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी केले.**

### पत्रकार यांचे विकास कामात महित्वाचे योगदान-उपमुकाअ स्मिता पाटील

**स्वातंत्र्याच्या चळवळी पासून ते आता पर्यंत लोकशाहीत पत्रकार यांचे योगदान महत्वाचे राहिले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पत्रकारांचे मोठे योगदान आहे. विकास कामांची माहिती सर्व सामान्य जनते पर्यंत पोहचविणेसाठी प्रशासनास महत्वाची मदत होत असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी**

# पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने उत्कृष्ट पत्रकार व समाजसेवकांचा गौरव





**वर्धा । प्रतिनिधी**
पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्य वर्धा जिल्हा समितीच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त जिल्ह्यातील उत्कृष्ट पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ६ जानेवारी रोजी सत्यनारायण बजाज वाचनालय, मगनवाडी येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस होते. त्यांनी आपल्या भाषणात प्रिंट मीडियाच्या महत्त्वावर प्रकाश टाकत म्हटले की, लेखणी ही सामान्य जनतेसाठी नेहमीच अडचणीत आधारवड ठरली आहे. आधुनिक काळातही प्रिंट मीडियावर लोकांचा विश्वास कायम आहे. पत्रकारांनी आपली लेखणी समाजासाठी उपयोगी ठरवावी.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेशवर, शेतकरी नेते विजय जावंधिया, ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल, नागपूर येथील लोकमतचे वरिष्ठ पत्रकार नरेश डोंगरे, कस्तुरबा हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी डॉ. गिरीश देव यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात पत्रकार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दिनेश श्याम पाटील, योगेश कांबळे, दिनेश घोडमारे, ओमप्रकाश ढवळे यांसह अनेक पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ओमप्रकाश ढवळे यांना जमनाबाई जावंधिया स्मृती उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार देण्यात आला. त्यांनी आपल्या पुरस्काराची रक्कम सामाजिक कार्यासाठी परत केली. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आशिष कुचेवार, बबन यादव, योगीराज कोचाडे, अकील शेख, डॉ. विठ्ठल लठे, अनिता येवले यांसह इतर समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतिश काळे यांनी केले, तर संचालन ग्रामीण जिल्हाध्यक्ष संदीप रघाटाटे यांनी केले. आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष शशांक चतारे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजीव वाघ, विनोद महाजन, प्रविण करोले, संतोष देशमुख, बाळु मुंगले यांसह अनेक पदाधिकाऱ्यांचे योगदान लाभले.

# शब्द सह्याद्री साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने दर्पण दिन उत्साहत साजरा

## शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या वतीनेही पत्रकार दिन साजरा

**लासुर । प्रतिनिधी**
लासुर स्टेशन येथील शब्द सह्याद्री साहित्य प्रतिष्ठानच्या व शिल्लेगाव पोलिसांच्यावतीने आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची २१३ वी जयंती तसेच मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू झाल्याचे स्मरणार्थ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दर्पण दिन साजरा करण्यात आला.



सर्वप्रथम क्रांती पब्लिक स्कूल मध्ये झालेल्या कार्यक्रमात लासुर स्टेशन शहरातील सर्व पत्रकार बांधव यांचा सत्कार करून समाजाच्या उन्नतीसाठी व न्याय हक्कांसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ प्रतिष्ठान सदस्य डॉ. विकास सांगेकर हे होते तर सूत्रसंचालन प्रा अशोक म्हस्के यांनी आणि प्रास्ताविक ज्ञानेश्वर वाघचौरे तर आभार प्रा शशिकांत सांगवीकर यांनी केले. याप्रसंगी शहरातील पत्रकार बांधव सर्वश्री अशोक जयस्वाल, नवलचंद कोठारी, अविनाश संगेकर, श्रीराम मढीकर,मकसूद शेख, विनोद जाधव, प्रकाश सातपुते, रमेश नेटके, गुलाब वाघ, फिरोज मंसूरी, सलीम सय्यद, सुनिल झिंजुर्डे,गणेश म्हैसमाळे, बाळासाहेब कदम, विजय क्षीरसागर, संदीप गायकवाड यांच्यासह प्रतिष्ठान सदस्य गोविंद हिवाळे, मच्छिंद्र बडोगे, श्याम शर्मा, प्रशांत दाभाडे यांची उपस्थिती होती शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या शुभहस्ते लासुर स्टेशन येथील पोलीस चौकी मध्ये सर्व पत्रकारांचा शाल श्रीफळ व पेन देऊन सत्कार करण्यात आला.

### पत्रकारा समाजाचा कणा... पोलीस निरीक्षक सलीम चाऊस

**दरम्यान लासुर स्टेशन येथील पोलीस चौकीमध्ये दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पोलीस निरीक्षक सलीम चाऊस व पोलीस विट अश्रमलदार तात्याराव बेद्रे यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक सलीम चाऊस म्हणाले की पत्रकार हा समाजाचा कणा आहे त्यामुळे तो लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे समाजात होणारे अन्याय,अत्याचार, गुन्हेगारी, याला वाचा फोडण्याचे काम पत्रकार बांधव करत असतात काही काही घटनेमध्ये तर पोलिसांच्या आधी पत्रकारांना व पत्रकार तत्काळ पोलिसांना ती माहिती कळतात त्यामुळे आरोपी व गुन्हा निष्पन्न व्हायला वेळ लागत नाही परिणामी पत्रकार व पोलीस या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असेही सलीम चाऊस म्हणाले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीट अंमलदार तातेराव बेद्रे यांनी केले.**

# लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेत पत्रकारांचा सत्कार



**कुर्डूवाडी स प्रतिनिधी**
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर शाखा कुर्डूवाडी येथे पत्रकार दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आला.

पत्रकार दिनानिमित्त कुर्डूवाडी शहरातील सर्व पत्रकार बांधवांना आमंत्रित करून संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सल्लागार प्राध्यापक दास यांनी पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वावर प्रकाश टाकत पत्रकारांच्या कार्याची प्रशंसा केली. समाजामध्ये जागरूकतेने काम करणारे आणि समाजातील विविध घटकांना न्याय देणारे पत्रकार म्हणून विनायक दीक्षित, विजय चव्हाण, सुनील शिंदे, आणि दिनेश शिंदे यांचा फुलचंद धोका यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोकमंगल नागरी पतसंस्थेच्या शाखाधिकारी अनिता यांनी केले, तर आभार फुलचंद धोका यांनी मानले. या प्रसंगी संस्थेतील सर्व स्टाफ उपस्थित होता. पत्रकारांच्या कार्याची कदर करणारा हा कार्यक्रम त्यांच्या कार्याचे महत्त्व व्यक्त करणारा ठरला.

# नांदूर-मधमेश्वर पाण्यासाठी शेतकरी आक्रमक;कालव्यात पाणी सोडण्याची मागणी

### कालव्यात पाणी मिळाले नाही तर आंदोलन तीव्र करणार

**शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरली असूनही पाणी देण्यात आलेले नाही. जर लवकरच कालव्यातून पाणी सोडले गेले नाही, तर आम्ही आमचे आंदोलन तीव्र करू, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.**




**गंगापूर । प्रतिनिधी**
नांदूर-मधमेश्वर जलद कालव्याचे पाणी मिळावे, या मागणीसाठी शिरजगाव, मालुजा, संजरपूर आणि अन्य गावांतील शेतकऱ्यांनी तीन दिवसांपासून सामूहिक आंदोलन सुरू केले आहे. प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही तोडगा न निघाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. कालव्यातून पाणी सोडण्यासंदर्भात नांदूर-मधमेश्वर कालवा (नां.म.का) प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांनी आंदोलनाकडे पाठ फिरवल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. चार गावांतील शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरूनही कालव्यातून पाणी उपलब्ध होत नसल्याने ते अडचणीत आले आहेत. प्रशासनाच्या असंवेदनशील कारभारामुळे ही समस्या उद्भवल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वैजापूर तालुक्यात पावसाअभावी भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.संदीप खाजेकर, मंगेश साळवे, नानासाहेब गात, स्वप्नील खाजेकर, रघुनाथ आघाडे, तात्याराव शिरसाठ, भानुदास साळवे, लक्ष्मण भुसारे, कृष्णा पवार (चेअरमन) आणि उपसरपंच यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचा तातडीने प्रश्न सोडवावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.नांदूर-मधमेश्वर कालव्यात पाणी सोडण्यासंबंधी विचारण्यासाठी प्रभारी अधिकाऱ्यांना संपर्क साधला असता, त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. यामुळे शेतकऱ्यांचा रोष अधिकच वाढला आहे.प्रशासनाकडून या मागण्यांकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# अष्टपैलू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्या आड, वणी विभागात शोक संवेदना

## श्रद्धेय हरिप्रसाद पांडे यांची प्राणज्योत मावळली, मारेगाव येथे अंत्यसंस्कार

**मारेगाव । प्रतिनिधी**
शिक्षक या पेशातून प्रख्यात झालेले आदर्श हायस्कूल येथे कार्यरत होते, यासह पत्रकारिता सुद्धा करीत होते. परिसरात धार्मिक कथा वाचन विवाह जोडणी यासह सामाजिक कार्यात अग्रेसर भूमिका त्यांनी जीवनात पार पाडली. कुणावर अन्याय होऊ नये करिता त्यांचे सातत्य असायचे. या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची जनतेत चांगलेच प्रतिबिंब उमटले असताना त्यांचे अनुयायी सुद्धा आहेत. असा दैनंदिन क्रम असतानाच कौटुंबिक जबाबदारीतून पत्नी गीतादेवी यांच्या सहकार्यातून त्यांनी मुलांना उच्चविद्याविभूषित करून अधिकारी प्राध्यापक बनविले यांनी समाजकार्याची चावी त्यांना दिली. सर्वसमावेशक धोरण जीवनात श्रद्धेय हरिप्रसाद पांडे गुरुजी यांनी अवलंबिवले होते. मारेगाव तालुक्यातील करणवाडी हे त्यांचे मूळ गाव होते. कालांतराने ती मारेगाव येथे



वास्तव्यास आले. वणी विभागात त्यांच्या कार्यशैलीने प्रख्यात झाले होते. विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग असायचा.प्रकृती अस्वस्थ असताना सुद्धा सामाजिक कार्यात सहभागी व्हायला ते जोखीम स्वीकारत असत. संस्कृत भाषेचे सुद्धा त्यांना ज्ञान अवगत असल्याने धार्मिक ग्रंथ वाचनातून अनुवाद करून अनुयायांना महत्त्व सांगत असत. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची ता. ५ ला नऊ वाजताच्या दरम्यान वणी येथे राहत्या घरी प्राणज्योत मावळली. मृत्यू समयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. त्यांचे अंतिम दर्शन लर्नर्स अकॅडमी येथे घेण्याकरिता दुपारी दोन वाजता पार्थिव ठेवले होते या प्रसंगी हजारो चाहत्यांनी अंतिम दर्शन घेतले तर पाच वाजता मारेगाव येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार झाले . त्यांच्या पश्चात पत्नी गीतादेवी, मुले जेष्ठ संपादक शैलेश पांडे, नायब तहसीलदार विवेक पांडे, प्राध्यापक सतीश पांडे, मुलगी कल्पना माळोदे (पांडे)असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# लायन्स क्लबचे कार्य प्रेरणादायी, शैक्षणिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उधळली स्तुतीसुमने

**शहापूर । रविंद्र धारवणे**
विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी या उदात्त हेतूने लायन्स क्लब ऑफ किंग्ज सर्कल शाळांमध्ये विविध उपक्रम राबवत आहे. याच उद्देशाने शहापूर तालुका एज्युकेशन सोसायटीच्या ग.वि.खाडे विद्यालयातील ४ हजार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मागील तीन वर्षांत तब्बल १ कोटी १४ लाख रुपयांचा निधी दिला असून, त्याने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.तसेच, याच उपक्रमातून स्व. विठ्ठलराव खाडे सभागृहाचे उद्घाटन फ्रूडनबर्ग गाला हाऊसचे चेअरमन चंद्रकांत गाला आणि द लायनेस क्लब ऑफ किंग्ज सर्कलचे चेअरमन चंदन सी. गाला यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेक्रेटरी भारती संघराजका, खजिनदार पौर्णिमा मेहता, एज्युकेशन संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष सदाशिव खाडे, विश्वनाथ शेनॉय, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष जयवंतभाऊ देशमुख, सचिव




विद्याताई वेखंडे, ॲड. निखिल खाडे, विजय जागरे, दिपक बजाज आदी मान्यवर उपस्थित होते.
ठाणे जिल्ह्यात नामांकित असलेल्या शहापूर तालुका एज्युकेशन संस्थेच्या खाडे विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालयात ४ हजारांहून अधिक विद्यार्थी ज्ञानार्जनाचे कार्य करीत आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेत लायन्स क्लब ऑफ किंग्ज सर्कलने १५ लाख रुपयांचे वॉटर कुलर आरो प्लॅन्ट, शालेय परिसरात १२ लाख रुपयांचे पेव्हर ब्लॉक, ५५ लाख रुपयांचे सोलर ऊर्जा प्रकल्प आणि ३१ लाख रुपयांचे स्व. विठ्ठलराव खाडे सभागृहाचे नूतनीकरणासाठी खर्च केले. या निधीची व्यवस्था करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर तळपाडे यांनी विशेष मेहनत घेतली, ज्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी श्री. तळपाडे यांचे विशेष कौतुक केले. तसेच, संस्थेच्या शाळांमध्ये स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये प्रथम तीन क्रमांकांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या सर्व शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन बिरारी आणि वैशाली जागरे यांनी केले.